# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# वार्षिक अहवाल : सन २०१५-२०१६

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्य | ३-६ |
| २ | संचालक मंडळ | ६ |
| ३ | व्यवस्थापन | ७-९ |
| ४ | वित्तीय स्थिती | १०-१२ |
| ५ | इतर विभाग | |
| | (अ) बाजार समिती विभाग | १३-१६ |
| | (ब) निर्यात विभाग | १७-२३ |
| | (क)प्रकल्प विभाग | २४-२६ |
| | (ड) अभियांत्रिकी विभाग | २७-३३ |
| | (इ) संगणक विभाग | ३४-३६ |
| | (ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग | ३७-४२ |
| | (प) कृषि व्यापार विकास विभाग | ४३-५३ |
| | (फ) तळेगाव शेती विभाग | ५४ |
| ६ | इतर प्रकल्प | |
| | १) आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी सहाय्यीत - कृषि समृद्धी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM) | ५५-५८ |
| | २) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) | ५९-६१ |
| | ३) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत - कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (AIDIP) | ६२-६४ |

# १. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०१५-१६ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ३२ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ३२ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

**उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम :**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत ;

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.

२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.

३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.

४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.

५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.

६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.

८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.

९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.

१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.

११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

**अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम**

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसित करणेकरिता नव -नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

२. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Valule addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.

३. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे / बियाणे / कंद यांची आयात करणे.

४. शेतकऱ्यांसाठी परदेश दौरे आयोजित करणे.

५. बाजार समित्यांची लिलाव प्रक्रीया व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करणे.

६. कृषि पणन मंडळ, पणन संचालनालय व बाजार समित्यांच्या कामकाजासाठी संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वीत करणे.

७. बाजार समित्यांचे पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

८. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.

९. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.

१०. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.

११. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्यातीबाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.

१२. प्रकल्प अहवाल तयार करणे.

१३. तळेगांव ताभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.

१४. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.

१५. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.

१६. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.

१७. 'कृषि पणन मित्र' मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.

१८. ' उत्पादक ते ग्राहक ' योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.

१९. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.

२०. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञानासंबंधात विविध चाचण्या घेणे.

२१. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.

२२. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.

२३. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२४. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे

२५. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.

२६. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

२७. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.

२८. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी सुविधांची उभारणी करणे.

२९. कृषि मालाचे ब्रँण्ड विकसित करणे.

३०. राष्ट्रीय कृषी बाजार (National Agriculture Market) प्रकल्पात राज्यातील ३० बाजार समित्यांचा समावेश करणे.

३१. कृषि उत्पन्न बाजार समित्यांसाठी कॉमन अकौंटिंग सिस्टिमचा वापर करणे.

३२. उत्पादक ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत 'शेतकरी आठवडे बाजार' योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करणे.

३३. शेतकरी उत्पादक कंपन्यांना सल्ला सेवा, मदत, मार्गदर्शन करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे मजबूतीकरण करणे.

३४. आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करणे या अंतर्गत राज्यातील शेतीमाल शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून इतर राज्यात विक्री करणे तसेच इतर राज्यातील शेतीमाल विना मध्यस्त आपल्या राज्यात विक्रीसाठी आणणे.

३५. निर्यातदार आणि शेतकरी / गट / कंपन्या यांचे सांगड घालून निर्यातील प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

३६. निर्यातीस चालना देण्यासाठी 'हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग प्रोग्राम' आयोजित करुन निर्यातदार तयार करणे.

३७. निआम - जयपूर, मॅनेज – हैद्राबाद, आय.आय. एफ.टी. – नवी दिल्ली, डी.एम.आय.,वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ को-ऑप मॅनेजमेंट, आय.सी.एम., पुणे यांच्या मदतीने विविध प्रशिक्षण, कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच त्यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या तसेच कृषि पणन मंडळाचे अधिकारी पाठविणे.

# २. संचालक मंडळ

| क्रम | संचालकाचे नाव व पदनाम | हुद्दा |
|---|---|---|
| १) | **मा.ना.चंद्रकांत दादा पाटील,**<br>मंत्री सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) | **अध्यक्ष** |
| २) | **मा.ना.श्री. राम शिंदे,**<br>राज्यमंत्री , गृह, (ग्रामीण), पणन, सार्वजनिक आरोग्य , पर्यटन. | **उपाध्यक्ष** |
| ३) | **मा.आ.श्री.दिलिपराव मोहिते**,<br>सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणे | **सदस्य** |
| ४) | **श्री.चंद्रकांत दळवी (भा.प्र.से.)**<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. | **सदस्य** |
| ५) | **श्री.विकास देशमुख (भा.प्र.से.)**<br>आयुक्त ,(कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | **सदस्य** |
| ६) | **श्री.भवेश कुमार जोशी,**<br>उपकृषि पणन सल्लागार, भारत सरकार, प्रादेशिक कार्यालय, मुंबई. | **सदस्य** |
| ७) | **नाबार्ड प्रतिनिधी**, पुणे | **सदस्य** |
| ८) | **ॲड. सुधीर दौलतचंद कोठारी,**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट, जि. वर्धा. | **सदस्य** |
| ९) | **श्री. तात्यासाहेब दगडू हुले,**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाटोदा, जि. बीड | **सदस्य** |
| १०) | **श्री. दिनेश ओऊळकर (दि. ०१/०४/२०१५ते २१/०५/२०१५)**<br>कृषि पणन संचालक म.रा., तथा संचालक,म.रा.कृ.प.मं., पुणे<br>**डॉ.किशोर तोष्णीवाल, (दि. २२/०५/२०१५ पासून)**<br>कृषि पणन संचालक, म.रा., | **सदस्य** |
| ११) | **श्री.मिलिंद आकरे,**<br>कार्यकारी संचालक, म.रा.कृषि पणन मंडळ, पुणे | **सदस्य सचिव** |

# ३. व्यवस्थापन

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. मिलिंद आकरे | ----- | कार्यकारी संचालक |
| २. | श्री. मिलिंद आकरे | ---- | सरव्यवस्थापक |
| ३. | श्री.पी.ए.अष्टेकर, उपसरव्यवस्थापक<br>डॉ. बी. एन. पाटील, उपसरव्यवस्थापक अति. पदभार<br>डॉ. प्रशांत सोनवणे, उपसरव्यवस्थापक | दिनांक ०१/०६/२०१५ पर्यंत<br>दिनांक ०९/०६/२०१५ पर्यंत<br>दिनांक १०/०६/२०१५ पासून | बाजार समिती /बीडीपी |
| ४. | श्री.ओ.व्ही.निला, उपसरव्यवस्थापक | --- | अभियांत्रिकी |
| ५. | श्रीमती पूनम मेहता, उपसरव्यवस्थापक<br>डॉ. प्रशांत सोनवणे, उपसरव्यवस्थापक | दिनांक ३०/०९/२०१५ पर्यंत<br>दिनांक २१/१०/२०१५ पासून | प्रशासन / प्रकल्प / निर्यात<br>प्रशासन / प्रकल्प / बा.स. / बी.डी.पी. |
| ६. | श्री. जितेंद्र व्ही. कोळंबे, उपसरव्यवस्थापक | दिनांक २७/०४/२०१५ पासून | वित्त व लेखा |
| ७. | डॉ. बी. एन. पाटील,<br>सहाय्यक सरव्यवस्थापक,<br>प्राचार्य | ----<br>----- | कृषि व्यापार विकास व जनसंपर्क व प्रसिध्दी<br>पदव्युत्तर, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे |
| ८. | श्री.एम.एल.लोखंडे,<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | ----- | संगणक |
| ९. | श्री.डी.एम.साबळे,<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | दिनांक २३/०६/२०१५ पर्यंत<br>दिनांक २४/०६/२०१५ पासून | प्रशासन व प्रकल्प<br>निर्यात / व्ही. एच. टी. वाशी |
| १०. | श्रीमती एस.ए.तांभाळे, विधी अधिकारी<br>व्यवस्थापक | --- | विधी अधिकारी<br>जनसंपर्क व प्रसिद्धी |
| ११. | श्री.जयंत कोकणे, व्यवस्थापक, | --- | वित्त व लेखा |
| १२. | सौ.एस.पी.राऊत, व्यवस्थापक, | --- | एम.ए.सी.पी. |
| १३. | श्री.ए.पी.पाटील, व्यवस्थापक | दिनांक १०/०६/१५ पर्यंत | कृषि व्यापार विकास |
| १४. | श्री.जे.जे.जाधव, व्यवस्थापक<br>श्री.एस.पी.बाजारे, व्यवस्थापक | दिनांक १०/०६/१५ पर्यंत<br>दिनांक ११/०६/२०१५ पासून | अभियांत्रिकी |
| १५. | श्री.बी.जी.कातोरे, व्यवस्थापक | - | बाजार समिती |
| १६. | श्री. के.एस. फटांगरे , व्यवस्थापक | - | संगणक |
| १७. | श्री.व्ही.व्ही.जगदाळे, व्यवस्थापक | - | संगणक |
| १८. | सौ.एस.एस.अंतुरकर, व्यवस्थापक | - | एम.ए.सी.पी. |
| १९. | श्री. एस.आर. घाटगे, व्यवस्थापक | - | एम.ए.सी.पी. |
| २०. | श्री.एस.डी.मेहेरकर, व्यवस्थापक (प्र) | --- | शेती (तळेगाव) |
| २१. | श्री. डी.एस पाटील, व्यवस्थापक<br><br>श्री. पी. डी. टेकाळे, व्यवस्थापक (प्र) | दि. २४/०६ /२०१५ पर्यंत<br>दि. २५/०६/२०१५ पासून<br>दि. २५ /०६/२०१५ पासून | प्रशासन<br>बी.डी.पी.<br>प्रशासन |
| २२. | श्री. ए.ए. औताडे | दि. ०५/०६/२०१५ पासून | शेतमाल तारण योजना |

## विभागीय उपसरव्यवस्थापक/ विभागीय सहायक सरव्यवस्थापक / विभागीय व्यवस्थापक /जिल्हा पणन अधिकारी

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए.एन. देशमुख, उपसरव्यवस्थापक<br>श्री. डी. डी. देशमुख , उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार<br>श्री.एस. यु. शिरापुरकर, उपसरव्यवस्थापक<br>डॉ. अशोक एस गार्डी, उपसरव्यवस्थापक | दि.०८/०६ /२०१५ पर्यंत<br>दि.२९/१२ /२०१५ पर्यंत<br>दि.१९/०१/२०१६ पर्यंत<br>दि. १९/०१/२०१६ पासून | पुणे |
| २. | श्री.सी.एम.बारी, उपसरव्यवस्थापक | ---- | नाशिक |
| ३. | श्री.ए. एल.घोलकर, अतिरिक्त पदभार उपसरव्यवस्थापक<br>श्री. एम. डी. बरडे, अतिरिक्त पदभार उपसरव्यवस्थापक<br>कु. शुभांगी सं. गोंड, उपसरव्यवस्थापक | दि. ०७/०५/२०१५ पर्यंत<br>दि. ३१/१२/२०१५ पर्यंत<br>दि. ०१/०१/२०१६ पासून | लातूर |
| ४. | श्री.एन.एस.चव्हाण, उपसरव्यवस्थापक<br>श्री. ए. जे. विरकर , उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार<br>श्री.एम. यु. राठोड, उपसरव्यवस्थापक | दि. २४/०६/२०१५ पर्यंत<br>दि. ०४/०२/२०१५ पर्यंत<br>दि. ०५/०२/२०१५ पासून | अमरावती |
| ५. | श्री.एस.पी.कांबळे, उपसरव्यवस्थापक<br>श्री. एम. एस.गवळे, उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार<br>श्री. सचिन भिमराव घोडके, उपसरव्यवस्थापक | दि. २४/०६/२०१५ पर्यंत<br>दि. ०६/०८/२०१५ पर्यंत<br>दि. ०७/०८/२०१५ पासून | नागपूर |
| ६. | श्री.एम.बी. सुरवसे, उपसरव्यवस्थापक<br>श्री. जी. सी. वाघ, उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार<br>श्री. एम. एन. साळुंके पाटील, उपसरव्यवस्थापक | दि. २०/१०/२०१५ पर्यंत<br>दि. २५/११/२०१५ पर्यंत दि.<br>२६/११/२०१५ पासून | औरंगाबाद |
| ७. | श्रीमती प्रणिती बुरांडे, उपसरव्यवस्थापक | ---- | रत्नागिरी |
| ८. | श्री. एस.एस. घुले, उपसरव्यवस्थापक, अतिरिक्त पदभार<br>श्री. संपत टी. गुंजाळ , उपसरव्यवस्थापक, | दि.१३/०१/२०१६ पर्यंत<br>दि.१४/०१/२०१६ पासून | कोल्हापूर |
| ९. | श्री. सुरेंद्र एम. तांबे, प्रशासकीय अधिकारी | दि.१४/०१/२०१६ पासून | पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे |
| १०. | श्री.डी.डी.देशमुख, सहाय्यक सरव्यवस्थापक | --- | पुणे |
| ११. | श्री.एम.पी.पवार, सहायक सरव्यवस्थापक | -- | बी.डी.पी. / प्रकल्प |
| १२. | श्री.एन.बी.पाटील, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | वि. का.नाशिक |
| १३. | श्री.एम.डी.बरडे, सहाय्यक सरव्यवस्थापक, | -- | वि. का.लातुर |
| १४. | श्री.ए.जे.विरकर, जिल्हा कृषि पणन अधिकारी/ व्यवस्थापक | --- | अमरावती |
| १५. | श्री. ए.जे. पवार, जिल्हा कृषि पणन अधिकारी /व्यवस्थापक, | ---- | कोल्हापूर |
| १६. | श्री.एस.पी.बाजारे, जिल्हा कृषि पणन अधिकारी/व्यवस्थापक<br>श्री. आर. के. जूनघरे, अतिरिक्त पदभार | दि. ०९/०६/२०१५ पर्यंत<br><br>दि. १०/०६/२०१५पासून | बुलढाणा |
| १७. | श्री. डि.एम. डागा, जिल्हा कृषि पणन अधिकारी /व्यवस्थापक | -- | यवतमाळ |
| १८. | श्री.जी.सी.वाघ, जिल्हा कृषि पणन अधिकारी /व्यवस्थापक | -- | औरंगाबाद |

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १९. | श्री.टी.एस.नांगरे, जिल्हा कृषि पणन अधिकारी /व्यवस्थापक | ---- | सांगली |
| २०. | श्री.एम.डी.गंभीरराव, जिल्हा कृषि पणन अधिकारी / व्यवस्थापक | ---- | ठाणे/मुंबई/पालघर |
| २१. | श्री.एस.एस.गवळे, जिल्हा कृषि पणन अधिकारी / व्यवस्थापक | ---- | अकोला/वाशीम |
| २२. | श्री.एस.एस.सोनवणे, जिल्हा कृषि पणन अधिकारी / व्यवस्थापक | ---- | नंदुरबार |
| २३. | श्री.ए.ए.औताडे, जिल्हा कृषि पणन अधिकारी / व्यवस्थापक | दि. ०४/०६/२०१५ पर्यंत | गोंदिया/भंडारा |
| २४. | श्री.एम.के.फळे, जिल्हा कृषि पणन अधिकारी/ व्यवस्थापक | ---- | रत्नागिरी/सिंधुदुर्ग/रायगड |
| २५. | श्री. एस.डी. वाघमोडे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | ---- | सोलापूर |
| २६. | श्री.ए.जे.कुदळे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | ---- | पुणे |
| २७. | श्री.ए.के.नादरे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | ---- | जालना |
| २८. | श्री.एस.व्ही.माने, जिल्हा कृषि पणन अधिकारी<br>श्री. ए. बी. हैशी, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. ०८/०६/२०१५ पर्यंत<br>दि. ०९/०६/२०१५ पासून | सातारा |
| २९. | श्री.बी.सी.देशमुख, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. ०३/०८/२०१५ पर्यंत<br>दि. १०/०८/२०१५पासून | नाशिक<br>वर्धा |
| ३०. | श्री.शैलेश जाधव, जिल्हा कृषि पणन अधिकारी | -- | बीड |
| ३१. | श्री.पी.डी.टेकाळे, जिल्हा कृषि पणन अधिकारी<br>श्री. एस. टी. शेळके, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. ०६/०६/२०१५ पर्यंत<br>दि. ०७/०६/२०१५पासून | लातूर |
| ३२. | श्री.जी.डी.पाटील, जिल्हा कृषि पणन अधिकारी | -- | उस्मानाबाद |
| ३३. | श्री.जे.बी.राखोंडे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | --- | परभणी |
| ३४. | श्री.एस.पी.काळे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | --- | गडचिरोली / नागपूर |
| ३५. | डॉ.के.एस.तुपे, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. ०५/०६/२०१५ पर्यंत | वर्धा |
| ३६. | श्री.एस.टी.शेळके, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. ०५/०६/२०१५ पर्यंत<br>दि. ०६/०६/२०१५पासून | चंद्रपूर<br>लातूर |
| ३७. | श्री. जे.बी. जगताप, जिल्हा कृषि पणन अधिकारी | -- | ठाणे / रायगड |
| ३८. | श्री. एस. एस. पाटील, जिल्हा कृषि पणन अधिकारी | -- | धुळे / जळगाव |
| ३९. | श्री. एफ.एफ. सिध्दीकी, जिल्हा कृषि पणन अधिकारी | ---- | नांदेड |
| ४०. | श्री.जे.बी.जगताप, जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. २४/०७/२०१५ पर्यंत<br>दि. ३१/०७/२०१५पासून | ठाणे<br>नाशिक |
| ४१. | श्री.जे. एन. शिंदे , जिल्हा कृषि पणन अधिकारी | दि. १६/०६/२०१५पासून | जळगाव |

# ४. वित्तीय स्थिती

## उत्पन्नाची साधने -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९ (ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९ (ल)(३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१.०३.२०१६अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

### ताळेबंद — २०१५-२०१६

(रु. कोटीत)

| अ.क्र | देयता | रक्कम रु. | संपत्ती | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मार्केटिंग फंड | ३६८.५९ | स्थावर मालमत्ता | १४८.१८ |
| २ | बँक ओव्हरड्राफ्ट | ०.०० | गुंतवणूक | २२४.३० |
| ३ | चालु देयता | २५.८७ | बँकेतील शिल्लक | ८.१६ |
| ४ | अनुदान ( अपेडा व इतर) | ४४.२४ | अखेरच्या मालाचा साठा | ०.०२ |
| ५ | मार्केटिंग एक्सटेन्शन फंड | ७.३३ | बाजार समिती कर्ज येणे | १३.१२ |
| ६ | कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड | ४६.७९ | चालु देयता | १५.२९ |
| ७ | आर.के.व्ही.वाय. अनुदान | ३.७० | आयकर | १०८.८१ |
| ८ | तरतूद | २१.३६ | | |
| | **एकूण** | **५१७.८८** | **एकूण** | **५१७.८८** |

### उत्पन्न व खर्च — २०१५-२०१६

(रु. कोटीत)

| अ.क्र. | खर्च | रक्कम रु. | उत्पन्न | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | ११.०८ | बाजार समिती कर्जावरील व्याज | ३.०९ |
| २ | प्रशासकीय खर्च | २.३ | गुंतवणुकीवरील व्याज | १६.२३ |
| ३ | निर्यातवृध्दी | ०.९६ | प्रकल्प सल्ला विभाग | ०.०२ |
| ४ | विकास व प्रकल्प | ०.०७ | निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न | १.१७ |
| ५ | घसारा | ५.८० | कृषि पणन मित्र वर्गणी | ०.२३ |
| ६ | तरतूद | १.५३ | इतर उत्पन्न | १.०० |
| | **एकूण** | **२१.७४** | **एकूण** | **२१.७४** |

मंडळाचे अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ९.०० टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याज दर ७.५० टक्के ते ९.७५ टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

**लेखे तपासणी —**

पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०१२-२०१३ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

## सन २०१६-२०१७ अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)


| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंशदान | ३५.०० | ३१.३८ |
| २ | कर्ज वसुली | ३०.०० | २६.९० |
| ३ | कर्जावरील व्याज (बा.स. व इतर) | ५.०० | ४.४८ |
| ४ | गुंतवणुकीवरील व्याज | २०.०० | १७.९३ |
| ५ | मुदत ठेवीवरील कर्ज | ५.०० | ४.४८ |
| ६ | निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न | ३.५० | ३.१४ |
| ७ | अनुदान (आर.के.व्ही.वाय., अपेडा व इतर ) | १०.४५ | ९.३७ |
| ८ | इतर उत्पन्न | २.५७ | २.३० |
| | **एकूण** | **१११.५२** | **१००.००** |

## सन २०१६-२०१७ अर्थसंकल्प — विनियोग


(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाजार समिती कर्ज वाटप व अनुदान वाटप | ४६.०० | ४१.२५ |
| २ | आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च | १७.९४ | १६.०९ |
| ३ | मुदत ठेवींवरील कर्ज, घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | ७.१० | ६.३७ |
| ४ | भांडवली खर्च (मुख्यालय, निर्यात सुविधा केंद्रे व इतर) | १२.४४ | ११.१५ |
| ५ | निर्यात प्रमोशन व विकास व प्रकल्प | २८.०४ | २५.१४ |
| | **एकूण** | **१११.५२** | **१००.००** |

## सन २०१६-२०१७ अर्थसंकल्प — उत्पन्न




## सन २०१६-२०१७ अर्थसंकल्प - विनियोग



# ५. इतर विभाग

## अ ) बाजार समिती विभाग

महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमध्ये ३०६ बाजार समित्यां व ५९६ उपबाजार कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे ;

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उप बाजार |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | २० | ४२ |
| २. | नाशिक | ३९ | ८१ |
| ३. | पुणे | ३७ | १०१ |
| ४. | औरंगाबाद | २८ | ५८ |
| ५. | लातूर | ५७ | ८६ |
| ६. | अमरावती | ५४ | ९२ |
| ७. | नागपूर | ५० | ७६ |
| ८. | कोल्हापूर | २१ | ६० |
| | **एकूण** | **३०६** | **५९६** |

### १) अंशदान

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण ३०० कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली ;

| दि. ३१/०३/२०१५ अखेर थकीत रु. | सन २०१४-१५ ची अंशदान मागणी रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. | वसूल रक्कम रु. | येणेबाकी रु. |
|---|---|---|---|---|
| ७४१.५२ | ३३४९.८५ | ४०९३.६९ | ३१२३.९५ | ९६९.७४ |

### २) कर्ज

**अ) विकासात्मक कर्ज :**

कृषि पणन मंडळा मार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने जमीन खरेदी, जमीन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार, कांदा चाळ बांधकाम तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश आहे.

अहवाल वर्षात एकूण ०६ कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे करण्यासाठी एकूण रक्कम रु.७,३७,४५,७०६/- इतके कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

**तिमाही कर्ज**

| अ. | बाजार समितीचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | पारनेर, जि. अहमदनगर | २८/०४/२०१५ | ४,००,०००० | १ ला हप्ता विकास कामे |
| २ | पाटोदा, जि. बीड | ०६/०५/२०१५ | ८,००,०००० | ३ रा हप्ता विकास कामे |
| ३ | इंदापूर, जि. पुणे | १५/०५/२०१५ | २५,००,००० | १ ला हप्ता विकास कामे |
| ४ | पाटोदा, जि. बीड | २०/०५/२०१५ | २१,९०,७७४ | ४ था हप्ता विकासकामे |
| ५ | इंदापूर, जि. पुणे | १४/१०/२०१५ | ५७,००,००० | २ रा हप्ता विकासकामे |
| ६ | अकलूज, जि. सोलापूर | १४/१०/२०१५ | ५०,००,००० | १ ला व अंतिम हप्ता विकासकामे |
| ७ | पारनेर, जि. अहमदनगर | २९/१०/२०१५ | १६,४०,६२३ | २ रा हप्ता विकासकामे |
| ८ | इंदापूर, जि. पुणे | ०१/१२/२०१५ | ११,५०,०००० | ३ रा हप्ता विकासकामे |
| ९ | पाटोदा, जि. बीड | ०८/१२/२०१५ | १०,८३,४५३२ | ४ था हप्ता विकासकामे |
| १० | घोटी बु.।।, जि. नाशिक | २२/०१/२०१६ | ६५,७९,७७७ | MACP अंतर्गत विकासकामे १ ला व अंतिम हप्ता. |
| ११ | इंदापूर, जि. पुणे | १०/०३/२०१६ | २८,००,००० | MACP ४ था हप्ता विकासकामे |
| १२ | उमरेड, जि. नागपूर | १७/०३/२०१६ | १३,००,०००० | MACP १ ला हप्ता विकासकामे |
| | **एकुण** | | **७,३७,४५,७०६/-** | |

**कर्जाचे व्याजदर** - राज्यातील बाजार समित्यांचे सर्व प्रकारचे दिर्घ व अल्प मुदत कर्जाचे व्याजदर ८ व १० टक्के वरुन कमी करुन सर्व बाजार समित्यांसाठी एकसमान म्हणजेच ६ टक्के इतका दि.१२/०२/२०१६ पासून अदा करण्यात येणाऱ्या नविन कर्जासाठी तसेच यापूर्वी मंजुर झालेल्या परंतु दि.१२/०२/२०१६ नंतर अदा करण्यात येणाऱ्या कर्ज हप्त्यास लागू करण्यात आलेला असून दि.९/३/२०१६ चे परिपत्रकान्वये सर्व बाजार समित्यांना कळविण्यात आले आहे.

**ब) शेतमाल तारण कर्ज योजना**

सन २०१५-१६ अहवाल वर्षात सोयाबीन, धान, तुर व चना इ. पिकांसाठी शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत खालील एकूण ३१ बाजार समित्यांना रक्कम रु. १२०१.२१ लाख कर्ज अदा करण्यात आले आहे;

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | कर्ज वाटप रक्कम रु. |
|---|---|---|
| **अ)** | **अमरावती विभाग** | |
| १. | मंगरुळपीर, जि. वाशिम | ३५,७३,९४२ |
| २. | कारंजालाड, जि.वाशिम | ८८,२०,००० |
| ३. | मोर्शी, जि.अमरावती | ६,६४,००० |
| ४. | चिखली, जि.बुलडाणा | १,४५,००० |
| ५. | मारेगांव, जि. यवतमाळ | २,६५,१०० |
| ६. | कळंब, जि. यवतमाळ | ६,५८,५०७ |
| ७. | उमरखेड, जि.यवतमाळ | १०,६१,००० |
| ८. | राळेगांव, जि.यवतमाळ | २८,६०,८२४ |
| ९. | झरीजामणी, जि.यवतमाळ | २,०७,००० |
| १०. | पांढरकवडा, जि.यवतमाळ | ४०,०६,८४५ |
| ११. | चांदूररेल्वे, जि.अमरावती | ६०,००० |

| | | |
|---|---|---|
| १२. | धामणगांवरेल्वे, जि. अमरावती | १९,८०,००० |
| १३. | दर्यापूर, जि.अमरावती | ५०,००० |
| १४. | वरूड, जि. अमरावती | ९,७९,८०० |
| | **एकुण अमरावती विभाग** | **२,५३,३२,०१८** |
| **ब)** | **नागपूर विभाग** | |
| १. | हिंगणघाट, जि.वर्धा | १,५७,१५,००० |
| २. | गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर | ८१,४५,१०० |
| ३. | वरोरा, जि.चंद्रपूर | ९३,७९,७१२ |
| ४. | पुलगाव, जि.वर्धा | १,५२,३७,२४६ |
| ५. | चंद्रपूर, जि.चंद्रपूर | २९,४९,९८९ |
| ६. | राजूरा, जि.चंद्रपूर | २३,११,१३४ |
| ७. | सिंदी, जि.वर्धा | १९,४७,५७३ |
| ८. | अर्जुनीमोरगांव, जि. गोंदिया | २०,००,००० |
| ९. | आर्वी, जि.वर्धा | १७०१७३७ |
| १०. | वर्धा, जि.वर्धा | ३,७५,१४४ |
| ११. | लाखनी, जि.भंडारा | ४६,६९,८०० |
| १२. | गडचिरोली, जि.गडचिरोली | १५,८७,४०० |
| | **एकुण नागपूर विभाग** | ६,६०,१९,८३५ |
| **क)** | **लातूर विभाग** | |
| १. | लातुर, जि. लातूर | १,२५,५६,९०० |
| २. | रेणापूर, जि.लातूर | ५७,६३,००० |
| ३. | उदगीर, जि.लातूर | ७५,००,००० |
| ४. | धर्माबाद, जि.नांदेड | २८,९०,००० |
| | एकुण लातूर विभाग | २८७०९९०० |
| **ड)** | **नाशिक विभाग** | |
| १ | लासलगांव, जि. नाशिक | ५,८९५० |
| | **एकूण नाशिक विभाग** | **५८,९५०** |
| | **एकूण एकंदर बा. स. (३१)** | **१२,०१,२०,७०३** |

## ३) अर्थसंकल्प मंजुरी

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यातील कलम ३८ आणि त्याखालील संबंधित नियमान्वये अहवाल वर्षात २९९ बाजार समित्यांचे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे १५२ बाजार समित्यांचे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले. तसेच सन २०१४-१५ चे ९६ बाजार समित्यांचे पुनर्विनियोजन पत्रके मंजुर / नामंजुर करण्यात आली.

### ४) थेट पणन अंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील खरेदीवरील बाजार फी बाबत

महाराष्ट्र शासनाकडील दि.५ जानेवारी २००४ चे आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आय.टी.सी.लि., कारगील इंडिया प्रा.लि., मेगासेव प्रा.लि., रिलायन्स फ्रेश लि. व राधाकृष्ण फुडलँड प्रा.लि., आदित्य बिर्ला क्वाडरँगल ट्रेडिंग सर्व्हिसेस, महा. कंझ्युमर फेडरेशन, महिंद्रा शुभ लाभ या कंपन्यांना उक्त अधिनियमातील कलम ७ मधून सुट देऊन महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवाराबाहेर

शेतमालाची थेट खरेदी करण्यासाठी काही अटींस अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वरील कंपन्यांकडून शेतमालाची मोठ्या प्रमाणात खरेदी चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळण्यास मदत होते.

सदरील कंपन्यांनी दि. १/१/२०१५ ते ३१/१२/२०१५ अखेर कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावरील बाजार फी व देखरेख फी कृषि पणन मंडळाकडे जमा केलेली आहे. ५२ अनुज्ञप्ती धारक कंपन्यांनी खरेदी केलेल्या एकूण शेतीमालाची देय होणारी एकूण १९४ बाजार समित्यांची बाजार फी रु. १,०४,९१,०९४/- व देखरेख फी रु. ४,५३८/- अशी एकूण १,०४,९५,६३२/- इतकी रक्कम संबंधित बाजार समित्यांना अदा करण्यात आलेली आहे.

# ब) निर्यात विभाग

निर्यात विभागांतर्गत शेतक-यांसाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरीता कृषि विभाग, सहकार विभाग, कृषि विद्यापिठ व स्थानिक बाजार समिती यांचे सहकार्याने ग्रामिण भागात सतत प्रशिक्षण कार्यक्रमांचे माध्यमातून पॅकेजिंग, प्रशितकरण, शीतगृह, वाहतूक व कृषिमालाचे काढणी पश्चात आवश्यक प्रक्रिया या विषयासंदर्भात शेतकरी व त्याच्या संस्थाना मार्गदर्शन करण्यात आले आहे. कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, निर्यात सुविधा केंद्र तसेच प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशिल आहे.

कृषि पणन मंडळामार्फत कृषि मालाच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत विविध देशातील आयातदार शोधणे, विविध फळे व प्रक्रियायुक्त पदार्थांचे नमुने विविध देशातील आयातदारांना पाठविणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभागी होऊन महाराष्ट्रातील कृषि माल व प्रक्रियायुक्त उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठांचे शोध घेणे तसेच कृषिमालाचे निर्यातीसाठी उत्पादक शेतक-यांना व सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याचे काम कृषि पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाचे सुविधा केंद्रातून अमेरिका, आखाती देश, न्यूझीलंड, युरोपियन देशांना हापूस, केशर आंबा, गुलाब स्टेम्स व भाजीपाला यांची निर्यात करण्यात आलेली असून सध्या कृषि पणन मंडळामार्फत डाळींब, केळी, संत्रा, कांदा, आंबा पल्प, काजू, फुले इ. च्या निर्यातीबाबत प्रयत्न करणेत येत आहेत.

**निर्यात वृध्दीकरीता पायाभूत सुविधांची उभारणी :**
राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली असून, सदर कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली असून, अहवाल वर्ष अखेर कृषि पणन मंडळामार्फत उभारण्यात आलेल्या निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील पुढीलप्रमाणे :

## निर्यात सुविधा केंद्रे:

१. सुगी पश्चात कृषिमालाचे होणारे नुकसान कमी होण्याच्या दृष्टीने व विविध आयातदार देशांच्या मागणीचा विचार करता कृषि पणन मंडळाने काळाची गरज लक्षात घेता निर्यातीसाठी आवश्यक पायाभुत सुविधांची उभारणी अपेडा, राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वनिधी वापरुन स्थानिक सहकारी संस्था व बाजार समिती यांचे सहकार्याने राज्यात सर्वदुर निर्यात सुविधा केंद्र व आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. अपेडा, नवी दिल्ली व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या सहकार्याने राज्यात १३ ठिकाणी राज्यातील कृषि मालाची निर्यात वृध्दीस चालना मिळण्यासाठी व शेतक-यांच्या शेतमालास देशांतर्गत व परदेशात बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तसेच नाशवंत कृषि मालास चांगला दर मिळवून देण्यासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आलेली आहे. यासाठी रु. ५६.५२ कोटी इतकी गुंतवणूक करणेत आलेली आहे. ज्यायोगे शीतगृह क्षमता ६०५ मे.टन , प्रशितकरण ६१० मे.टन व रायपनींग चेंबर ७० मे.टन इतकी क्षमता निर्माण झालेली आहे. या सुविधांचा वापर करून आतापर्यंत सुमारे

५१,८१४ मे.टन कृषिमालाची हाताळणी व प्रक्रीया या केंद्राचे माध्यमातून करण्यात आलेली आहे. या सुविधा केंद्रांमधून आंबा, कारले, डाळींब, केळी इ.फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करुन अमेरिका, आखाती देश, जपान व युरोपीय देशांमध्ये निर्यात करणेत आली आहे. तसेच सुविधा केंद्र, तळेगांव दाभाडे व फुले निर्यात सुविधा केंद्र, एम.आय.डी.सी. , तळेगाव दाभाडे जि. पुणे येथून ४३,७२,१५६ गुलाब स्टेम्सची निर्यात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या निर्यात सुविधा केंद्र येथील फळे, भाजीपाला व फुले प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

## सुविधा केंद्र वापर – सन २०१५-२०१६

| अ.क्र. | सुविधेचे नाव | देश | प्रक्रिया (मे.टन) |
|---|---|---|---|
| १. | व्हि.एच.टी. सुविधा केंद्र, वाशी , नवी मुंबई | युरोपिय देश, आखाती देश | २९३.६४ |
| २. | डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | युरोपिय देश, आखाती देश | ९८.०० |
| ३. | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर जि. पुणे | ---- | ---- |
| ४. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर जि. पुणे | आखाती देश | ११७५.२३ |
| ५. | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र,जामसंडे जि. सिंधुदुर्ग | अमेरिका | ---- |
| ६. | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र,नाचणे जि.रत्नागिरी | अमेरिका | २.०६ |
| ७. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना जि. जालना | स्थानिक | ६.०४ |
| ८. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, लातूर, जि. लातूर | स्थानिक | २३५.०० |
| ९. | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.) जि.वर्धा | स्थानिक | २३.५ |
| १०. | निर्यात सुविधा केंद्र ,तळेगाव, जि.पुणे | युरोपिय देश | |
| ११. | कांदा व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, कळवण, जि. नाशिक | स्थानिक | ---- |
| १२. | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा, जि. जळगांव | स्थानिक | २५९०.०० |
| १३. | केळी निर्यात सुविधा केंद्र, बसमत, जि. हिंगोली | स्थानिक | ७५.३७ |

**२.** राज्यात नवीन निर्यात सुविधा केंद्र (०९) व आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र (२०) यांची उभारणी करण्यात येत असून ज्यायोगे राज्यामध्ये ९७५ मे.टन शीतगृह क्षमता, प्रशितकरण १३५ मे.टन व रायपनींग चेंबर ७५ मे.टन इतकी क्षमता निर्माण होणार असून फळे व भाजीपाल्याकरीता काढणी पश्चात हाताळणीद्वारे निर्यात व स्थानिक विक्री व्यवस्थेकरीता ३४ सुविधा कार्यन्वित झालेल्या असून ११ सुविधा केंद्रांचे कामकाज प्रगतीपथावर असून डिसेंबर २०१६ अखेर कार्यान्वित होणार आहेत. सर्व सुविधांचा तपशील खालीलप्रमाणे ;

| अ.क्र. | सुविधा | संख्या | शीतगृह क्षमता मे.टन | प्रशितकरण मे.टन | रायपनिंग चेंबर मे.टन | रक्कम रु. कोटी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | १३ | ६०५ | ६१० | ७० | ५६.५२ |
| २. | आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र | २० | ५०० | १०० | -- | ५८.५५ |
| ३. | निर्यात सुविधा केंद्र (नवीन) | ०९ | ५७५ | ४५ | ७५ | ७३.४५ |
| ४. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ४ | ४०० | ४० | | १९.९२ |
| **एकुण** | | **४६** | **२०,०८०** | **७९५** | **१४५** | **२०८.४४** |

**अहवाल वर्षात_प्रगतीपथावर/पूर्ण झालेले/नियोजित असलेले प्रकल्प**

कृषि पणन मंडळामार्फत निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी अपेडा, नवी दिल्ली, राष्ट्रीय कृषि विकास योजना , स्थानिक सहकारी संस्था व बाजार समिती यांचे सहकार्याने करणेत येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**अ) फळे व भाजीपाल्याकरिता मॉडर्न मार्केटिंग सुविधा (२०)**

| क्र. | मॉडर्न मार्केटिंग सुविधा | क्षमता |
|---|---|---|
| १. | ठाणगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक | कोल्ड स्टोरेज २५मे.टन<br>प्रिकुलिंग ५मे.टन प्रति बॅच<br>अँन्टीचेंबर,प्लँटरूम,ऑफिस,स्टोअररूम<br>पॅकहाऊस एरिया-१५००स्क्वे.फूट<br>इलेक्ट्रिक व डी.जी.सेट<br>इनपुटशॉप-३<br>वॉटर सप्लाय<br>लॅबोरेटरी |
| २. | लोणी, ता.रहाता,जि.अ.नगर | |
| ३. | शिरपूर, ता. शिरपुर जि.धुळे | |
| ४. | यावल, ता. यावल जि.जळगाव | |
| ५. | पालघर, ता. पालघर जि.ठाणे | |
| ६. | शेलपिंपळगाव, ता.खेड,जि.पुणे | |
| ७. | मसूर, ता.कराड,जि.सातारा | |
| ८. | म्हसवड, ता. माण, जि.सातारा | |
| ९. | बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | |
| १०. | तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | |
| ११. | करमाड,ता. जि.औरंगाबाद | |
| १२. | घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना | |
| १३. | कळमनुरी, ता. कळमनुरी, जि.हिंगोली | |
| १४. | अर्धापूर, ता. अर्धापुर, जि.नांदेड | |
| १५. | माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड | |
| १६. | चांदूररेल्वे, ता. चादुंररेल्वे, जि.अमरावती | |
| १७. | देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि.बुलढाणा | |
| १८. | भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर | |
| १९. | मोहाडी, ता.मोहाडी, जि.भंडारा | |
| २०. | पुलगाव, ता.देवळी, जि.वर्धा | |

**ब) निर्यात सुविधा केंद्र (९)**

| अ.क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| १. | डाळिंब व द्राक्षे निर्यात सुविधा केंद्र,आटपाडी, जि. सांगली | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | पॅक हाउस | २००० स्क्वे. फुट |
| २. | केळी निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर, जि. पुणे | फार्म पॅक हाउस | संख्या-३ |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे.टन |
| | | रायपनींग चेंबर | २५ मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| ३. | कांदा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र,चांदवड, जि. नाशिक | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | कांदा चाळ व कांदा प्रतवारी यंत्रणा | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, खडकेवाके ता.रहाता, जि. अहमदनगर | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | १५० मे.टन |
| ५. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, बीड | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास |
| | | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |
| ६. | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरूड, जि.अमरावती | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे.टन |
| | | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |
| ७. | विकिरण सुविधा केंद्र, वाशी, नवि मुंबई | शितगृह | १०० मे.टन |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | रायपनींग चेंबर | २० मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| | | विकिरण | ५ मे.टन प्रति तास |
| | | तृणधान्ये व कडधान्ये | १० मे.टन प्रति तास |
| | | मसाले | डोसमॅपींग पूर्ण |
| ८. | भाजीपाला प्रक्रीया केंद्र, वाशी, नवी मुंबई. | शितगृह<br>प्रशितकरण<br>कारली,भेंडी,मिरची,वांगी व भाजीपाला प्रक्रीया लाईन्स | ५० मे. टन<br>५ मे. टन. / ६ तास<br>२ मे.टन / तास |
| ९. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, गोरेगांव, मुंबई | आंबा उष्ण जलप्रक्रीया<br>शितगृह<br>प्रशितकरण<br>रायपनिंग चेंबर<br>हाताळणी यंत्रणा | २.५ मे. टन/ प्रती बॅच<br>५० मे. टन<br>५ मे. टन. / प्रती बॅच<br>११ मे. टन. / प्रती बॅच<br>२ मे.टन / तास |

**क) फुले निर्यात सुविधा केंद्र (३)**

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | प्रत्येक प्रकल्पावरील सुविधांचा तपशिल / प्रकल्प | क्षमता / प्रकल्प |
|---|---|---|---|
| १. | तळेगाव, जि.पुणे | प्रशितकरण ( २)<br>शितगृह (४) | ५ मे. टन / ६ तास<br>२५ x ४ = १०० मे. टन |
| २. | सातारा, जि.सातारा | | |
| ३. | दिंडोरी, जि.नाशिक | | |

**विकीरण सुविधा केंद्र, वाशी**

निर्यातदारांच्या मागणीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कृषि पणन मंडळामार्फत आंब्यासाठी ४ टन प्रती तास एवढ्या क्षमतेची विकीरण सुविधेची उभारणीचे काम वाशी, नवी मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने व पणन मंडळाचा स्वनिधी असे एकंदरीत रु. २९.३६ कोटींची गुंतवणूक करुन पूर्ण झाले आहे.

अमेरिकेस निर्यातीकरिता विकिरण सुविधा प्रमाणित करण्याच्या अनुषंगाने दि.२५.२.२०१६ रोजी USDA-APHIS यांचे पाच सदस्यीय शिष्टमंडळाने तपासणी केली असून या शिष्टमंडळाच्या सकारात्मक अहवालाच्या आधारे दि. ४ एप्रिल २०१६ पासून अमेरिकेच्या यु.एस.डी.ए.- एफीसचे तपासणी अधिकारी डॉ. वेद्पाल मलीक यांनी भारतातील अमेरिकन दुतावासाच्या अधिकारी श्रीमती दिपा धानखार यांच्या समवेत सुविधेची संपूर्ण तपासणी केलेली असून सदरचा अहवाल त्यांनी वॉशिंग्टन, अमेरिका येथील त्यांच्या यु.एस.डी.ए. कार्यालयाला पाठवून सुविधेस दि. ७ एप्रिल २०१६ रोजी प्रमाणिकरण प्राप्त झाले आहे. त्यामुळे दि. १४ एप्रिल २०१६ पासून सदर सुविधेवरुन अमेरिका येथे आंबा निर्यातीकरीता विकिरण प्रक्रियेचा प्रारंभ झालेला आहे.

**भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई**

युरोपियन युनियनने भारतातून आयात होणाऱ्या आंबा व पाच भाजीपाल्यावर आयात बंदी केली आहे. या पार्श्वभुमीवर कृषि पणन मंडळाने पुढाकार घेऊन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अपेडा यांच्या सहकार्याने व कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई यांच्या जागेवर वाशी येथे भाजीपाला प्रक्रिया केंद्राची उभारणी केली आहे. सदरील सुविधेवर भेंडी,मिरची,कारले, वांगी व इतर भाजीपाला यावर हॉट वॉटर प्रक्रिया करण्यात येऊ शकणार आहे. तसेच सदरील सुविधेवर प्रिकुलींग व कोल्ड स्टोरेजची सुविधा देखील उभारण्यात आली आहे. सदर सुविधा वाशी येथे असल्याने ही सुविधा युरोपियन देशांमध्ये भाजीपाला निर्यात वृध्दीसाठी विशेष महत्वाची ठरणार आहे.

**व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधा, वाशी, नवी मुंबई**

जपान व न्युझिलंड या बाजारपेठात आंबा पाठविण्यासाठी त्यावर व्हेपर हीट ट्रिटमेंट करणे अत्यावश्यक असून सदर सुविधा सद्यस्थितीत महाराष्ट्रामधे फक्त पणन मंडळाकडे उपलब्ध आहे. जपान येथे आंब्याची निर्यात करण्यासाठी कृषि पणन मंडळामार्फत अपेडा, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने सन १९९९ - २००० मध्ये सुमारे रु. ४.०० कोटी खर्चाच्या व्ही .एच .टी .सुविधेची वाशी, नवी मुंबई येथे उभारणी करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ वर्षामध्ये व्ही.एच.टी. सुविधा केंद्रातील उपलब्ध सुविधांचा वापर करुन २९३.६४ मे. टन आंब्यावर प्रक्रिया करण्यात आली असून युरोपियन युनियन २४३.५४ टन , न्युझिलंड ४५.७५ मे.टन, जपान ४.३५ मे.टन यांच्या बाजारपेठेत निर्यात करण्यात आला आहे. सदर सुविधा केंद्राचे युरोपीय देशांना निर्यातीसाठी अपेडामार्फत प्रमाणिकरण करण्यात आले असून या सुविधा केंद्रांतून खाजगी निर्यातदारांमार्फत सन २०१५ - २०१६ मध्ये कारल्यावर प्रक्रिया करुन निर्यात करण्यात आली .

**व्ही. एच. टी. सुविधेवर कारल्याच्या चाचण्या**

युरोपियन युनियन तर्फे दि. १ मे २०१४ रोजी कारले व इतर ४ भाजीपाला पिकांवर आयातबंदी लावण्यात आलेली होती. युरोपिय देशांना कारल्याची निर्यात सुरू होण्याच्या अनुषंगाने NPPO, APEDA यांच्या सूचनेनुसार पणन मंडळाच्या व्ही. एच. टी. सुविधेवर आंब्याप्रमाणे कारल्याच्या चाचण्या घेण्यात आल्या असून त्या यशस्वी झाल्या आहेत. त्याचा अहवाल अंतिम झाला असून NPPO भारत सरकारच्या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. लवकरच युरोपीय देशांना निर्यात खुली होणे अपेक्षित आहे.

**ग्लोबलगॅप प्रमाणपत्र**

युरोपियन देश, अमेरिका व जपान अशा प्रगत राष्ट्रांना राज्यातील शेतमालाची विशेष करुन फळांची निर्यात करण्यासाठी ग्लोबलगॅप प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांच्या निर्यातीस चालना मिळण्याच्या दृष्टीने ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी शेतक-यांची संख्या वाढवणे गरजेचे आहे. आजअखेर २८९ शेतक-यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त असून त्यासाठी प्रमाणिकरण योजनेचे माध्यमातून शुल्काच्या ५० टक्के रक्कम कृषि पणन मंडळाकडुन अनुदान म्हणून अदा केली आहे.

सन २०१६-१७ साठी हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांकरीता प्रोत्साहनपर ग्लोबलगॅप प्रमाणिकरण अनुदान योजना राबविणेबाबत पणन मंडळाचे नियोजन आहे.

**आंबा व काजू कक्षाची स्थापना**

भारतात आणि महाराष्ट्रात आंबा व काजू पिकाखालील क्षेत्र जरी वाढत असले तरी या पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. तसेच या पिकाची काढणी पश्चात हाताळणी आणि प्रक्रिया यामध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी शिफारशीनुसार शास्त्रीय दृष्टिने प्रक्रिया करणे गरजेचे आहे. राज्यातील आंबा व काजू उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यपातळीवर एक आंबा व काजू मंडळ असणे आवश्यक असल्याने शासन निर्णय दि. ०६/१०/२०१३ व २४/०१/२०१४ मध्ये नमूद आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने आंबा व काजू कक्ष स्थापन केलेला आहे. आंबा व काजू कक्षाचे रत्नागिरी येथे कार्यालय सुरु करण्यात आले असून तेथे आंबा काजू कक्षाचे कामकाज सुरु करणेत आले आहे.

**निर्यात विभागामार्फत राबविण्यात येणा-या कृषिमाल निर्यात योजना**

महाराष्ट्रातून कृषिमालाची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीकोनातून पणन मंडळामार्फत निर्यातीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्या प्रामुख्याने खालीलप्रमाणे :

१. वैयक्तिक शेतकरी व सहकारी संस्था यांना आयात – निर्यात परवाना काढून देणे तसेच अपेडा नोंदणी करुन देणे.
२. देशनिहाय व उत्पादननिहाय परदेशातील आयातदारांची यादी उपलब्ध करुन देणे.
३. विविध देशांमध्ये कृषि मालाची निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्वालीटी स्टँडर्डस बाबत, पॅकींगबाबत तसेच त्या देशातील आयात कराबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे.
४. राज्यातील प्रगतशील व इच्छूक शेतकरी, उद्योजक यांचेसाठी निर्यातपूरक उपक्रमांमधे वाढ करावी हा विचार करून कृषि पणन मंडळामार्फत " हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स " आयोजनास सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून त्याचा कालावधी एक आठवड्याचा (५ दिवस) आहे. सदर प्रशिक्षण डिसेंबर २०१५ पासून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येत आहे. अहवाल वर्षात एकूण ४ प्रशिक्षण कार्यक्रमात एकूण ८०- प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत.

**क्लस्टर योजना**

अपेडा स्थापित फळे व भाजीपाल्यासाठी क्लस्टर योजनेअंतर्गत कृषि पणन मंडळामार्फत राज्यामधे केळी पिकासाठी पुणे, नाशिक, लातूर व कोल्हापूर या चार जिल्ह्यांमधे १८ प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन संपन्न झालेले असून त्याद्वारे सुमारे १३०० शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. यामधून शेतकऱ्यांची निर्यातदारासोबत सांगड घालून निर्यातक्षम मालाचे उत्पादन घेणे, त्यांच्या मालाची निर्यात करून अधिक दर प्राप्त करून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच यामधील प्रत्येक प्रशिक्षण कार्यक्रमामधून १० असे १८० केळी उत्पादकांची कामरेज, ता. जि. सुरत (गुजरात) येथील केळी बागांना व पॅकहाऊस भेटीचे नियोजन आहे.

**ट्रेसेबिलीटी नेट प्रणाली अंतर्गत निर्यातक्षम भाजीपाला पिकांसाठी कामकाज**

देशातून होणा-या कृषिमालाच्या निर्यातीमध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा वाटा आहे. देशाच्या एकूण निर्यातीच्या ४८ टक्के कांदा, २६ टक्के भाजीपाला निर्यात आपल्या राज्यातून होते. युरोपियन तसेच अमेरीका,चीन,थायलंड,कॅनडा इ. विविध देश सध्या कृषिमाल आयात करताना संबंधीत मालाच्या किडरोगमुक्त व किडनाशक उर्वरीत अंश मुक्त हमी बरोबरच त्याच्या पुर्वइतिहासाबाबत (ट्रेसिबिलीटी) मागणी

करत आहेत. युरोपियन युनियनला निर्यात होणारी ताजी फळे व भाजीपाला या पिकांच्या फायटोसॅनिटरी तपासणी व निर्यात प्रमाणिकरणासाठी केंद्र शासनाने एक आदर्श कार्यपद्धती (एस.ओ.पी.) विकसीत केलेली असून त्यामध्ये कृषिमाल उत्पादन ते निर्यात या संपूर्ण प्रक्रियेमधील विविध भागीदार संस्थांची जबाबदारी निश्चीत केलेली आहे. पणन मंडळाने पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, नाशिक, लातूर, परभणी ,बीड, जालना, व जळगाव येथील जिल्हा पणन व्यवस्थापक यांना व्हेजनेट अंतर्गत नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आलेले आहे. या अधिकाऱ्यांमार्फत कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. अपेडाने विकसीत केलेल्या मॅगोनेट ,व्हेजनेट, अनारनेट, ग्रेपनेट या ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी केलेल्या आंबा व भाजीपाला पिकांच्या नोंदणीचा राज्यस्तरीय आढावा घेण्यात येत असून या राज्यस्तरीय समितीमध्ये अपेडा, कृषि पणन मंडळ, कृषि विभाग, निर्यातदार, एन.पी.पी.ओ., इ. घटकांशी विचार विनिमय होवून निर्यातीचे अनुषंगाने कामकाज करण्यात येते.

# प्रकल्प विभाग

## १) प्रकल्प सल्ला सेवा

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा देण्यात येतात. सहकारी संस्था, बाजार समित्या, खाजगी उद्योग यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन देणे, पणन संचालनालयाकडील प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय अहवाल देणे या सारख्या सेवा या अंतर्गत पुरविण्यात येतात. तसेच पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि. योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात.

प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु. २४० कोटी आहे. अशा सर्व प्रकल्प अहवालांचे मुल्यांकन करुन प्रकल्पाद्वारे २०१५-१६ या आर्थिक वर्षात पणन मंडळास सुमारे रु. १.०० लाख सल्ला सेवा म्हणून प्राप्त झालेले आहेत. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात पणन मंडळामार्फत एकूण २ सविस्तर प्रकल्प अहवाल व ४ अभिप्राय अहवाल तयार करुन देण्यात आले आहेत.

## २) राज्यातील नियोजित प्रकल्प

आर.के.व्ही.वाय. अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण ६ प्रस्ताव सादर करण्यात आले ;

१. राज्यातील बाजार समित्यांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी (R.O. Drinking Water) सुविधा उभारणी, प्रकल्प खर्च रु. २४८८.९२ लाख,
२. राज्यातील बाजार समित्यांमध्ये Eco-Toilet with Bio-digester ची उभारणी, प्रकल्प खर्च रु.२४९५.८५ लाख, दोन्ही २५% अनुदानासाठी.
३. Vegetable Marketing infrastructure for Urban Cluster २९ districts , प्रकल्प खर्च रु. ६५७५.१० लाख, ५० टक्के अनुदानासाठी .
४. Creating Sustainabale Export for Cut Flowers from India, प्रकल्प खर्च रु. २३४४.९७ लाख PPP-IAD योजनेच्या धर्तीवर .
५. संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरुड करिता संत्रा निर्जलीकरण युनिट बसविणे पथदर्शी प्रकल्प , प्रकल्प खर्च रु.९४.६८९ लाख - १०० टक्के अनुदानासाठी.
६. शेतकरी स्तरावर सायलो गोदाम उभारणी, प्रकल्प खर्च रु. २१००.०० लाख, २५ टक्के अनुदानासाठी प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनास सादर केले.

## ३) टर्मिनल मार्केट

केंद्र शासनामार्फत सार्वजनिक व खाजगी भागीदारी संकल्पनेतून टर्मिनल मार्केटस मुंबई (ठाणे), नाशिक व नागपूर या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा अंदाजित प्रकल्प खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | टर्मिनल मार्केट | अंदाजीत खर्च रु.कोटी |
|---|---|---|
| १ | मुंबई((ठाणे) | २०० - २५० |
| २ | नाशिक | ६० |
| ३ | नागपूर | ७० |

राज्यात उभारण्यात येणा-या टर्मिनल मार्केटसच्या अंमलबजावणीकरिता मा. पणन मंत्री महोदयांचा अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) हे नोडल ऑफिसर व राज्याचे पणन संचालक हे अतिरिक्त नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पहात आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केट हे सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्यात येणार असून हब आणि स्पोक संकल्पनेवर चालविली जाणार आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केटस (Built Own and Operate) या धर्तीवर स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून निवडलेल्या खाजगी उद्योजकाकडून चालविले जाणार आहेत. टर्मिनल मार्केटकरिता राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून प्रकल्प खर्चाच्या २५ ते ४० टक्के परंतु कमाल रु. ५० कोटी इतके अनुदान प्राप्त होऊ शकते. खाजगी उद्योजकाची निवड दोन टप्प्यात (Request for Qualification & Request for Proposal ) स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्रशासनाने जुलै २००९ मध्ये टर्मिनल मार्केटकरिता सुधारीत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या असून त्यानुसार मुंबई, नाशिक व नागपूर या टर्मिनल मार्केटच्या उभारणीबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मुंबई (ठाणे) टर्मिनल मार्केटकरिता मौजे बाबगांव ता. कल्याण जि.ठाणे येथील ९२ एकर शासकीय जमिन पणन मंडळास हस्तांतरीत झालेली आहे. मुंबई टर्मिनल मार्केट उभारणीचे RFQ ची प्रक्रिया पूर्ण होऊन RFP टप्पा पूर्ण. दि. ३.३.२०१४ रोजी Unity Infraprojects Ltd. यांना लेटर ऑफ इंटेट व OMDA देण्यात आले. OMDA प्रक्रिया सुरु आहे.

नागपूर टर्मिनल मार्केटकिरता मौजे वारंगा, ता. व जि. नागपूर येथे शासकीय जागा उपलब्ध असून सदरची जागा पणन मंडळास हस्तांतरीत करणेबाबत शासन निर्णय झाला आहे. RFQ ची प्रक्रिया सप्टेंबर २०१२ मध्ये सुरु करणेत आली असून ७ प्रस्ताव प्राप्त झाले. छाननीअंती ४ फर्मस पात्र ठरल्या. संबंधितांना RFP सादर करण्यात आले. त्यानंतर विहीत मुदतीत एकच RFP प्राप्त झाला. त्याबाबत शासनास अवगत करण्यात आलेले आहे. त्याची अंतिम मुदत ७.१.२०१४ होती. विहीत मुदतीत नागपूर बाजार समितीचा एकच प्रस्ताव प्राप्त झाला होता. शासनाने पुन्हा जाहिरात देण्याबाबत सूचित केले होते. तथापि, नागपूर टर्मिनल मार्केटची जागेबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे बाब न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे पुन्हा जाहिरात देण्यात आलेली नाही.

नाशिक टर्मिनल मार्केट करीता पणन मंडळाकडे जागा हस्तांतर करणेसाठीचा प्रस्ताव महसूल व वन विभागाकडे आहे. याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

## ४) मॉडर्न मार्केट - बसमतनगर, जि. हिंगोली

टर्मिनल मार्केटच्या धर्तीवर मराठवाड्यातील मौजे कण्हेरगाव ता. बसमतनगर जि. हिंगोली येथे स्थानिक गरज लक्षात घेवून मॉडर्न मार्केट उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. प्रकल्प अंमल बजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदरचे मार्केट राज्य शासनाच्या वित्तीय सहभागाने स्थापन करावयाचे असून त्यासाठी शासनाने रु.१०.०० कोटी इतका निधी मंजूर केला आहे. तसेच प्रकल्पासाठी निवडलेली मौजे कण्हेरगाव येथील २६.४० हेक्टर जमीन शासनाकडून पणन मंडळाकडे वर्ग करण्यात आली आहे. सदरचा प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर उभारावयाचा आहे.
प्रस्तावित प्रकल्पाची शेतमाल हाताळणीची क्षमता ४०० मे.टन / प्रति दिन असून या अंतर्गत प्रस्तावित सुविधा कृषि मालाचे ग्रेडींग, पॅकींग, प्रशितकरण, शीतगृह, रायपनिंग, पॅकहाऊस, गोडावून, प्रक्रिया केंद्र, इलेक्ट्रॉनिक लिलावगृह इ. मुलभूत आधुनिक सुविधा आणि ऑफीस, प्रशिक्षणगृह, निवासगृह, माहिती केंद्र, बँक, पोस्ट ऑफीस इ. आवश्यक सुविधा तसेच प्रयोगशाळा, निर्यातदारांसाठी ब्लॉक, शॉपिंग सेंटर, हॉटेल, पेट्रोलपंप इ. वाणिज्यिक सुविधा.

मॉडर्न मार्केट उभारणीकरिता खाजगी उद्योजकाची निवड करण्यासाठी पणन मंडळाने Transaction Advisor (TA) ची नेमणूक केलेली असून फेज - १ ची प्रक्रिया (structuring & feasibility ) पूर्ण करण्यात आलेली

आहे. खाजगी उद्योजक शोधण्यासाठीची फेज - २ ची प्रक्रिया (Bid Process Management) सुरु करण्यात आलेली असून मार्च २०१२ मध्ये GTN (Global Tender Notice) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. एकच प्रस्ताव प्राप्त त्यामुळे सुधारीत RFQ cum RFP प्राप्त, त्यावर कार्यवाही सुरु करणेत येणार आहे.

याबाबत दि. २६.८.२०१४ रोजी ग्लोबल टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आले. प्रस्ताव सादर करणेची अंतिम मुदत दि.२९.९.२०१४ होती. मुदतीत तीन प्रस्ताव प्राप्त, त्यांची छाननी करुन पूर्णा सहकारी कराखान्याचा एकच प्रस्ताव पात्र ठरला. तुलना करण्यास वाव नसल्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे. फेरनिविदा काढण्याच्या सूचना शासनाकडून प्राप्त झाल्या आहेत.

## ५) औरंगाबाद टर्मिनल मार्केट

मॉडर्न मार्केट उभारणीकरिता खाजगी उद्योजकाची निवड करण्यासाठी पणन मंडळाने Transaction Advisor (TA) ची नेमणूक केलेली असून फेज - १ ची प्रक्रिया (structuring & feasibility ) चालू आहे. दि. ९.७.२०१२ च्या राज्य स्तरीय समितीच्या बैठकीत मा. मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये टर्मिनल मार्केट स्थापन करणेची निर्णय घेणेत आला. त्यानुसार औरंगाबाद येथे टर्मिनल मार्केट उभारणेबाबतची कार्यवाही करणेस मे. दाराशॉ आणि कंपनीला सूचित करणेत आलेले आहे. त्याबाबत कंपनीची/सल्लागाराची कार्यवाही सुरु आहे.

प्रकल्पास केंद्रशासनाची परवानगी घेणेसाठी प्रस्ताव तयार करुन कृषि व पणन विभागाकडे सादर करणे प्रस्तावित आहे.

## ६) कोकण पॅकेज

दि. २४ जून २००९ रोजी सिंधुदुर्ग येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोकण विभागातील आंबा व काजू प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याकरिता काजू प्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, गोदाम, पिक कर्ज तारण इ. रु.५७५ कोटींच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. इच्छुक लाभार्थी पुढे येण्याकरीता दि. २२/८/२००९ रोजी स्थानिक वृत्तपत्रात (रत्नागिरी टाईम्स) जाहीरात देण्यात आली. तसेच संबधीत माहिती पणन मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आली.

दि. २९/३/२०१० रोजी शासन निर्णय प्रसिध्द झाला. या पॅकेजची अंमलबजावणी केली आहे. पणन मंडळामार्फत लघु काजू प्रक्रिया प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले व इच्छूक लाभार्थींना मोफत देण्यात आले आहेत. तसेच काजू प्रक्रिया युनिट व गोदाम प्रकल्प अहवालही मागणीनुसार तयार करण्यात आले असून प्रस्ताव कर्ज मंजूरीकरिता बँकांना सादर करण्यात आले होते.

## ७) नाशिक पॅकेज

दि. २२ जुलै २००९ रोजी नाशिक येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत नाशिक विभागातील फळे व भाजीपाल्याकरिता आवश्यक पणन विषयक पायाभूत व प्रक्रिया सुविधा निर्माण करण्याकरिता रु. १३५ कोटींच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

# ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत उभारण्यात येणारे / राबविण्यात येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :-

**अ)** पणन मंडळामार्फत खालील प्रमाणे सुविधांची उभारणी करण्यात आलेली असून सध्या सदरील प्रकल्प सुरळीत कार्यान्वित आहेत. सदरील सुविधा केंद्रांवर पॅक हाऊस, प्रि-कुलिंग, कोल्ड स्टोरेज, रायपनिंग चेंबर इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

१. आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना, जि. जालना
२. हापूस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे, जि. रत्नागिरी
३. हापूस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे, जि. सिंधुदर्ग
४. केळी निर्यात सुविधा केंद्र, बसमत, जि. हिंगोली
५. केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा, जि. जळगांव
६. संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.), जि. वर्धा
७. शेतीमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर, जि. पुणे
८. आईस मेकिंग कोल्ड स्टोरेज, इंदापूर, जि. पुणे
९. केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, लातूर, जि. लातूर
१०. डाळींब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे
११. कांदा, द्राक्ष व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, कळवण, जि. नाशिक

अहवाल वर्षामध्ये वरील सुविधा केंद्रांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.

**ब)** अपेडा, नवी दिल्ली / राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (रा. कृ. वि. यो.) पणन मंडळामार्फत खालील निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. त्यासाठी अपेडा, नवी दिल्ली व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ७५ टक्के अनुदान प्राप्त होणार आहे. खालील सुविधा केंद्र उभारणीसंदर्भात अहवाल वर्षामध्ये कामकाज करण्यात आले आहे.

## १. निर्यात सुविधा केंद्र

### १.१ ( अ) इर्रेडिएशन प्रकल्प, वाशी, नवी मुंबई (रा. कृ. वि. यो. + अपेडा)

- प्रकल्पांतर्गत रॅडिएशन सोर्स : कोबाल्ट – ६०, सोर्स तीव्रता : ३०० कि. क्युरी., रॅडिएशन युनिट - आंबा ५ मे. टन / तास, प्रि-कुलिंग (१ युनिट) ५ मे. टन / ६ तास, कोल्ड स्टोरेज (४ युनिट x २५ मे. टन) १०० मे. टन, रॅडिएशन प्रोसेसिंग हॉल ८,२०० चौ. फुट, प्रि-कुलिंग, कोल्ड स्टोरेज - प्रोसेस हॉल ४६०० चौ. फुट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. २,९३६.०१ लाख इतकी आहे.
  - सुविधा दि. ११/०३/२०१५ रोजी पणन मंडळाकडे हस्तांतरीत.

### १.१ ( ब) फळे व भाजीपाला सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई (अपेडा)

- प्रकल्पांतर्गत हॉट वॉटर ट्रिटमेंट - १ मे.टन/तास, शितगृह- ५० मे.टन, प्रशितकरण- ५ मे.टन/६ तास भाजीपाला प्रक्रिया लाईन्स (कारली,भेंडी, मिरची,वांगी व इतर) इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. १५८.२० लाख (अधिक कर) इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचे काम अंतीम टप्प्यात आहे.

### १.२ फळे व भाजीपाला सुविधा केंद्र, मौजे खडकेवाके, ता. राहाता, जि. अहमदनगर (रा. कृ. वि. यो.)

- प्रवरा संस्थेस शासनाने विषयांकीत प्रकल्प उभारणीसाठी मौजे खडकेवाके, ता. राहाता, जि. अहमदनगर येथिल सर्व्हे नं. ४१६ मधिल क्षेत्र १३.०२ हे. आर. पैकी ५ एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रकल्पांतर्गत ५ मे. टन क्षमतेचे प्रि-कुलींग १ चेंबर, १ x १०० मे. टन व २ x २५ मे. टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, प्लँट, मशिनरी व इलेक्ट्रीफिकेशनसह पॅकहाऊस, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ६४६.६३ लाख इतकी आहे.
- सुविधा दि. १७/०६/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत.

### १.३ केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र बीड, जि. बीड (रा. कृ. वि. यो.)

- प्रकल्प उभारणीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, जि. बीड यांनी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे.
- प्रकल्पांतर्गत ५ मे. टन क्षमतेचे प्रि-कुलींग चेंबर, २x २५ मे. टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, २५ मे. टन प्रति बॅच क्षमतेचे रायपनिंग चेंबर, पॅक हाऊस आणि प्लँट, मशिनरी, इलेक्ट्रीफिकेशन, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ५४९.४४ लाख इतकी आहे.
- सुविधा दि. १५/११/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, औरंगाबाद कडे हस्तांतरीत.

### १.४ केळी निर्यात सुविधा केंद्र. इंदापूर, जि. पुणे (रा. कृ. वि. यो.)

- प्रकल्प उभारणीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापूर, जि. पुणे, फार्म पॅक हाऊससाठी अकलुज व वालचंदनगर येथिल जागा संबधित कृ.उ.बा.समितीने उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रकल्पांतर्गत ५ मे. टन क्षमतेचे प्रि-कुलींग, २५ मे. टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, २५ मे. टन प्रति बॅच क्षमतेचे रायपनिंग चेंबर, प्लँट, मशिनरी व इलेक्ट्रीफिकेशन, दोन पॅकहाऊस (फार्म लेव्हल अकलुज आणि वालचंदनगर) इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ८०९.७८ लाख इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचे काम अंतीम टप्प्यात आहे.

**१.५ डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि.** सांगली **(रा. कृ. वि. यो.)**

- प्रकल्प उभारणीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, जि. सांगली येथिल गट नं. ३७१४५ मधिल १३.४४ हे.आर. पैकी ०.५० हे. आर. जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (५ मे. टन), कोल्ड स्टोरेज (२ x २५ मे. टन), पॅक हाऊस, प्लँट रूम, अँटी रूम, डिस्पॅच प्लेट फॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डि.जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ५१२.४७ लाख इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचे काम अंतीम टप्प्यात आहे.

**१.६ कांदा, डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र, चांदवड, जि. नाशिक (अपेडा)**

- प्रकल्प उभारणीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड, जि. नाशिक यांनी मनमाड रोड लगत जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (५ मे. टन), कोल्ड स्टोरेज (२ x २५ मे. टन), ग्रेडींग पॅकींग युनिट, प्लँट रूम, अँटी रूम, डिस्पॅच प्लेट फॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डि. जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक, रोड व साईट डेव्हलपमेंट, कांदा चाळ १० x ५० मे. टन इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ७३०.३४ लाख इतकी आहे.
- सुविधा दि.१८/१/२०१६ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत.

**१.७ संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरूड, जि. अमरावती (रा. कृ. वि. यो.)**

- श्री. पंजाबराव देशमुख कृषि प्रक्रिया संस्था, वरुड यांनी एम. आय. डी. सी., अमरावती येथे निर्यात सुविधा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन दिलेली आहे.
- प्रकल्पांतर्गत प्रि-कुलिंग - ५ मे. टन / ६ तास - १ नं., कोल्ड स्टोरेज — २५ मे. टन, - १ नं., ग्रेडिंग लाईन २ मे. टन / तास, पॅक हाऊस आणि प्लँट, मशिनरी, इलेक्ट्रीफिकेशन, स्टाफ क्वॅार्टर, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ८६०.२९ लाख इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचे काम अंतीम टप्प्यात आहे.

**१.८ आंबा पॅकहाऊस, गोरेगाव (अपेडा)**

- गोरेगांव येथील महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांच्या फुले निर्यात सुविधा केंद्र प्रकल्पात आंबा पॅकहाऊस उभारणी करण्यात येत आहे.
- प्रकल्पांतर्गत प्रि-कुलिंग ५ मे.टन/बॅच, रायपनिंग चेंबर- ११ मे.टन/बॅच, ग्रेडिंग लाईन- ३ मे.टन/तास, ट्रान्सफार्मरसहीत विद्युतीकरण इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ३२२.७० लाख इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**१.९ संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.), जि. वर्धा येथील प्रकल्पाच्या नव्याने सुधारणा करणे.**

- प्रकल्पांतर्गत ऑक्शन हॉल, टॉयलेट ब्लॉक, रोड, फर्निचर व इतर इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ११६.२५ लाख इतकी आहे.
- सदर प्रकल्पांतर्गत नव्याने सुधारणा करुन घटकांची निर्मीतीचे काम पुर्ण.

**२.० फुले निर्यात सुविधा केंद्र.**
**२.१ मोहाडी, जि. नाशिक (रा. कृ. वि. यो.)**

- प्रकल्प उभारणीसाठी बा. स. दिंडोरी यांचे कडील सर्व्हे क्र. १२८६ü मधिल २ एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. ϵप्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (२ x ५. मे. टन), कोल्डϑ स्टोरेज (४ üx २५ मे. टन), ग्रेडींग पॅकींग युनिट, प्लँट रूम, अँटी रूम, डिस्पॅच प्लॅटफॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डि. जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे.
- मंजूर निविदे नुसार प्रकल्पाची किंमत रु. ५५४.७७ लाख इतकी आहे.
- सुविधा दि. २३/०७/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत.

**२.२ तळेगांव (दाभाडे), जि. पुणे (अपेडा)**

- फ्लोरीकल्चर पार्क, एम. आय. डी. सी., तळेगांव (दा.) येथिल जागेवर प्रकल्प उभारणीचे काम करण्यात येत आहे.
- प्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (५ मे. टन क्षमतेचे - २ नग), कोल्ड स्टोरेज (२५ मे. टन क्षमतेचे - ४ नग), ग्रेडींग पॅकींग युनिट, प्लँट रूम, üअँटी रूम, üडिस्पॅच प्लॅटफॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डी.ü जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक इत्यादी सुविधांचा अंतर्भावÿआहे.
- मंजुर निविदेनुसार प्रकल्पाची किंमत रु. ७१६.०० लाखü इतकी आहे.
- सुविधा दि.२५/०६/२०१५ रोजी विभागीय कार्यालय, पुणे कडे हस्तांतरीत.

**२.३ सातारा, जि. सातारा (रा. कृ. वि. यो.)**

- अजिंक्यतारा शेतकरी सह. फळे, फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था यांनी एम. आय. डी. सी., सातारा येथे जागा उपलब्ध करुन दिलेली आहे.
- प्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (५ मे. टन क्षमतेचे - २ नग), कोल्ड स्टोरेज (२५ मे., टन क्षमतेचे - ४ नग), ग्रेडींग पॅकींग युनिट, प्लँट रूम, अँटी रूम, डिस्पॅच प्लॅटफॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डी. जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक इत्यादी सुविधांचा अंतर्भावÿआहे.
- सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

**३.० मॉडर्न मार्केटिंग सुविधा केंद्र**

राज्यामध्ये खालील २० ठिकाणी फळे व भाजीपाला करीता मॉडर्न मार्केटिंग सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. सदरील प्रकल्पांतर्गत प्रि-कुलींग (५ मे. टन), कोल्ड स्टोरेज (२५ मे. टन), ग्रेडींग पॅकींग युनिट, प्लँट रूम, अँटी रूम, डिस्पॅच प्लॅट फॉर्म, रिसिव्हिंग प्लॅटफॉर्म, डी. जी. सेट, ट्रान्सफॉर्मर, स्टोअर रूम, टॉयलेट ब्लॉक, शॉप्स, कंपाऊंड वॉल, रोड व साईट डेव्हलपमेंट इत्यादी सुविधांचा अंतर्भाव आहे. प्रकल्प उभारणीकरीता बाजार समिती, सहकारी संस्था यांनी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या सर्व प्रकल्पांची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | प्रकल्पाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | घनसावंगी | ३०२.३० | दि. ०२/११/२०१५ रोजी विभागिय कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे हस्तांतरण करण्यात आली. |
| २ | कळमनुरी | २८५.४८ | सुविधा दि. २७/०८/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, लातूर कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| ३ | करमाड | २८४.२१ | प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण. सुविधा हस्तांतरणाकरीता तयार आहे. |
| ४ | राजगुरुनगर | ३०१.३५ | सुविधा दि. ११/१२/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, पुणे कडे हस्तांतरीत |

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | प्रकल्पाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| | | | करण्यात आली. |
| ५ | मसुर | ३०५.२७ | सुविधा दि. १०/११/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, कोल्हापूर कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| ६ | माजलगांव | २७७.१३ | सुविधा दि. २६/०८/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, औरंगाबाद कडे हस्तांतरीत करण्यात आली |
| ७ | अर्धापुर | २८९.९७ | सुविधा दि. २७/०८/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, लातूर कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| ८ | यावल | २९१.०४ | सुविधा दि. २६/०७/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| ९ | पुलगांव (वर्धा) | २९९.०६ | स्थापत्य विषयक काम जवळपास पूर्ण, यंत्र सामूग्रीचे काम पूर्ण, लोड टेस्ट पूर्ण. |
| १० | चांदुर रेल्वे | २८५.७८ | सुविधा दि. १८/०३/२०१५ रोजी विभागीय कार्यालय, अमरावती कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| ११ | लोणी | २७९.९९ | स्थापत्य विषयक काम पूर्ण. मशिनरी उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. |
| १२ | शिरपुर | २८३.५८ | सुविधा दि. ०१/१०/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| १३ | देऊळगांवराजा | २९७.५७ | सुविधा दि. २४/०४/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, अमरावती कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| १४ | भिवापूर | २९८.०१ | No Load test पूर्ण, लोड टेस्ट बाकी. बाह्य विद्युतीकरणाचे काम बाकी. |
| १५ | पालघर | २९५.०० | प्रकल्पाची उभारणी स्थापत्य व मशिनरी कामासह पुर्ण झालेली आहे. Load test पूर्ण झाले असून प्रकल्प हस्तांतरणाकरीता तयार आहे. |
| १६ | ठाणगांव | २९५.२२ | सुविधा दि.०९/१०/२०१५ रोजी विभागीय कार्यालय, नाशिक कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| १७ | मोहाडी (भंडारा) | २८७.०३ | सुविधा दि. १९/०३/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, अमरावती कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| १८ | तळसंदे | ३०३.०६ | सुविधा दि.२८/०३/२०१६ रोजी विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. |
| १९ | बार्शी | २९५.३६ | सुविधा दि. ०१/०५/२०१४ रोजी विभागीय कार्यालय, पुणे कडे हस्तांतरीत करण्यात आली. |
| २० | म्हसवड | ३०९.४८ | सिव्हील व यंत्रसामुग्रीचे काम पुर्ण, लोड ट्रायल पूर्ण, बाह्य विद्युतीकरणाच्या कामाची निविदा कार्यवाही प्रगतीत. |

क) **राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत जहाल डाव्या विचारसरणीने प्रभावित चार नक्षलग्रस्त जिल्ह्यातील बाजार आवारांमधील पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणी प्रकल्प -** सदरच्या प्रकल्प अहवालानुसार या प्रकल्पांच्या उभारणीची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

- नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील आदिवासी व इतर शेतक-यांना चांगल्या प्रकारच्या पणन सुविधा पुरवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.

- आर्थिक स्थैर्यातून या भागातील सामान्य जनतेस नक्षलवादी चळवळीत सहभागी होण्यापासून परावृत्त करणे.
- हंगामात होणारी मोठ्या प्रमाणावरील शेतमालाची आवक अधिक कार्यक्षमपणे हाताळण्यास संबंधित बाजारपेठांना सक्षम करणे.
- कार्यक्षमतेतील वाढीमुळे पणन विषयक खर्चात घट साध्य करणे.
- संबंधित बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये आवश्यक स्वच्छता / आरोग्य राखून शेतमालाच्या सुगी पश्चात हानीमध्ये घट साध्य करणे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या ३ जिल्ह्यांतील ११ बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीसाठी रु. ३९.८७ कोटी किमतीचे प्रकल्पांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरिय प्रकल्प मंजूरी समितीने मंजूरी दिलेली आहे. या ११ बाजार समित्यांच्या प्रकल्पांचे कामकाज सन २०१०-२०११ पासून चालू असून सद्यस्थितीत त्यांची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत. या प्रकल्पांतर्गत या ३ जिल्ह्यातील एकूण ११ बाजार समित्यांना रु. २६.८८ कोटी अनुदान मंजूर असून आजअखेर राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून रु. २२.८० कोटी अनुदान पणन मंडळामार्फत देण्यात आलेले आहे. सदर ११ बाजार समित्यांची बाजार समितीनिहाय मंजूर प्रकल्प किंमत, मंजूर अनुदान रक्कम, बाजार समितीला अदा अनुदान रक्कम व प्रकल्पांवर झालेला एकूण खर्च याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे ;

(रु. लाख)

| अ.क्र. | जिल्हा | बा. स. चे नाव | RKVY मंजूर प्रकल्प किंमत | RKVY मंजूर अनुदान रक्कम | बा. स. ला अदा केलेली अनुदानाची रक्कम | बा. स. स्वनिधी खर्च | कामावर झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गडचिरोली | चामोर्शी व अहेरी (२ बा. स.) व त्यांचे ४ उपबाजार आवार | १२३१.०८ | ९२३.३२ | ७३०.५० | ३२८.१९ | १०५८.६९ |
| २. | गोंदिया | गोंदिया, गोरेगांव, आमगांव, तिरोडा व अर्जुनी मोरगांव (५ बा. स.) व त्यांचे ३ उपबाजार आवार | १९१७.२३ | १२५६.३७ | १११८.७२ | ३५८.४५ | १४७७.१७ |
| ३. | चंद्रपूर | पोंभूर्णा, सावली, सिंदेवाही व कोरपना (४ बा. स.) व त्यांचे ३ उपबाजार आवार | ८३८.३४ | ५०८.७६ | ४३०.५६ | १४२.२४ | ५७२.८० |

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत दुसऱ्या टप्प्यात गडचिरोली, भंडारा व चंद्रपूर या तीन जिल्ह्यातील १४ बाजार समित्यांचे एकूण रु. ६६.४० कोटी प्रकल्प खर्चाचे पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीचे प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या दि. २३ मे २०१३ रोजीच्या १६ व्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती

सभेमध्ये या प्रकल्पांना ७५% अनुदानासाठी तत्वतः मंजुरी देण्यात आली होती. त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाजार समिती | जिल्हा | प्रकल्पाची एकूण किंमत (रु. लाख) | प्रस्तावित अनुदान रक्कम (७५ %) (रु. लाख) |
|---|---|---|---|---|
| १. | आरमोरी | गडचिरोली | ५०६.९६ | ३८०.२२ |
| २. | गडचिरोली | गडचिरोली | ५००.०० | ३७५.०० |
| ३. | तुमसर | भंडारा | ४९७.२० | ३७२.९० |
| ४. | लाखांदूर | भंडारा | ४९५.४१ | ३७१.५६ |
| ५. | लाखनी | भंडारा | ५००.६८ | ३७५.५१ |
| ६. | पवनी | भंडारा | २४१.२० | १८०.९० |
| ७. | चिमूर | चंद्रपूर | ५३४.८१ | ४०१.११ |
| ८. | ब्रम्हपूरी | चंद्रपूर | ५०३.६८ | ३७७.७६ |
| ९. | वरोरा | चंद्रपूर | ५००.०० | ३७५.०० |
| १०. | राजुरा | चंद्रपूर | २९६.०७ | २२२.०५ |
| ११. | गोंडपिंपरी | चंद्रपूर | ५२३.७७ | ३९२.८३ |
| १२. | चंद्रपूर | चंद्रपूर | ५२३.५८ | ३९२.६८ |
| १३. | मूल | चंद्रपूर | ५१९.४६ | ३८९.५९ |
| १४. | नागभीड | चंद्रपूर | ४९७.०४ | ३७२.७८ |
| | | **एकूण** | **६६३९.८७** | **४९७९.८९** |

**ड) कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधिल स्थापत्य विषयक कामे :-**

सन - २०१५ / १६ मध्ये अभियांत्रिकी विभागामार्फत बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्तावांसंदर्भात छाननी करण्यात आलेल्या धारीकांचा तपशिल –

(A) अहवाल वर्षात खालील बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्तावांची / विनियोग दाखल्यांची - तांत्रिक छाननी करण्यात आली.

(१) राळेगांव, जि. यवतमाळ (२) पारनेर,जि. अहमदनगर (३) तळोदा जि. नंदुरबार (४) इंदापूर जि. पुणे (५) पाटोदा ,जि. बीड (६) जिंतुर जि.परभणी --- या बाजार समित्या.

(B) अहवाल वर्षात खालील बाजार समित्यांच्या - त्रुटी पुर्तता अहवालाची - तांत्रिक छाननी करण्यात आली.

(१) राळेगांव जि. यवतमाळ (२) पाटोदा जि. बीड.

**ई) इतर कामकाज :-**

- पणन मंडळाचे विभागीय कार्यालय, नाशिक येथिल कार्यालयाचे नुतनीकरणाचे काम पुर्ण झाले आहे.
- जाधववाडी, औरंगाबाद येथील कृषि पणन मंडळाच्या ताब्यातील जागेमध्ये अतिक्रमण होऊ नये व सुरक्षिततेच्या दृष्टिने संरक्षण भिंत बांधकामाचे काम कंत्राटदार यांचेकडून पूर्ण करुन घेण्यात आले.
- जाधववाडी, औरंगाबाद येथे विभागीय कार्यालयाच्या बांधकामाकरीता निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. विभागीय कार्यालयाचे बांधकाम प्रगतीत आहे.

## इ) संगणक विभाग

- **ई-ऑफिस संगणक प्रणाली कार्यान्वित**

  महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे मुख्यालय, विभागीय कार्यालय, एन.आय.पी.एच.टी. ही कार्यालये पेपरलेस करण्याच्या दृष्टीने टपाल व धारिका विषयक कामकाजासाठी एन.आय.सी. ची ई-ऑफिस संगणक प्रणाली दि.०१/११/२०१४ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. कृषि पणन मंडळास प्राप्त झालेला पत्रव्यवहार अथवा प्रत्येक विभागाची धारिका याबाबतची कार्यवाही नियमितपणे दि.०१/११/२०१४ पासून ई-ऑफिस संगणक प्रणालीद्वारे सुरू आहे. ई-ऑफिसचा वापर करुन टिपण्या व टपाल या डिजीटल स्वरुपात ठेवून कार्यालय पेपरलेस करण्यात येत आहे. टिपण्या व धारीकांना ऑनलाईन मंजूरी देण्यात येत आहे. यामुळे कामकाजात सुसूत्रता व पारदर्शकता आली आहे.

- **जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत पथदर्शी पाच बाजार समित्यांमध्ये संगणकीय ई-लिलाव प्रणाली कार्यान्वित**

  जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत सुरवातीला पाच बाजार समित्यामध्ये लिलाव प्रक्रियामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणणे या उद्देशाने ई लिलाव प्रणाली-राहता, चिखली,अकोट, धामणगाव रेल्वे व हिंगणघाट या पाच बाजार समित्यांमध्ये प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात आली आहे .या योजनेअंतर्गत बाजार समित्यांना संगणक सामुग्री व ईबाजार समित्यांमध्ये सर्व .लिलाव संगणक प्रणाली विनामुल्य पुरविण्यात आली आहे-टाबेस व मॉनिटरींग सिस्टीमच्याराज्यस्तरीय डे .बाजार घटकांना सॉफ्टवेअर प्रशिक्षण देण्यात आले आहे उद्देशाने बाजार समित्यांच्या आवारात गेटवरच आवकेबाबतच्या नोंदी घेण्यात येत आहेत .लिलाव प्रक्रीयेमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आल्याने शेतकऱ्यास अधिक भाव मिळण्यास मदत होत आहे.

- **कृषि पणन मंडळाचे कार्यालयीन कामकाजासाठी ई .एस.आय.मव ए.पी.आर.संगणक प्रणाली कार्यान्वित करणे**

  कृषि पणन मंडळ, एन.आय.पी.एच.टी. (एच.टी.सी.) व बाजार समित्या यांच्या कामकाजामध्ये सुसूत्रता व नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ स्तरावर ई.आर.पी. व एम.आय.एस. संगणक प्रणाली विकसित करणे बाबतची कार्यवाही सेवा पुरवठादार यांचेद्वारे सुरु आहे. पणन मंडळ व बाजार समित्या यांचे कामकाजासाठी सध्या कार्यरत असलेल्या संगणक प्रणाली व डेटाबेस यांचे नव्याने विकसित करावयाच्या संगणक प्रणालींबरोबर एकत्रिकरण (इंटिग्रेशन) करणे. यामुळे बाजार समिती स्तरावरील लिलाव प्रक्रिया व कार्यालयीन कामकाज तसेच पणन मंडळ व एन.आय.पी.एच.टी. (एच.टी.सी.) या स्तरावरील कामकाजाची माहिती ERP संगणक प्रणालीमध्ये एकदाच भरावी लागेल व अहवाल वेगवेगळ्या स्तरावर पाहता येतील. यामुळे माहिती संकलित करणे व त्याद्वारे विविध अहवाल तयार करण्यासाठी लागणारा वेळ व मनुष्यबळ यांची बचत होईल. तसेच एका क्लिकवर हवी ती माहिती केव्हाही कुठेही उपलब्ध होईल.

- **डेटा सेंटर**

  संगणक विभागात स्वतंत्र टियर ३ पद्धतीचे डेटा सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे. या डेटा सेंटर मध्ये वेब, मेल, डेटाबेस, ई-ऑफीस, बाजार समित्यांच्या कामकाजासाठी पणन मंडळाने विकसित केलेली ऑनलाईन संगणक प्रणाली, कॉम्प्युटराईज्ड बिडींग सिस्टीम इत्यादी साठी सर्व्हर कार्यरत आहेत. इंटरनेट साठी १६ एम.बी.पी.एस. ब्रॉड बॅन्ड व २० एम.बी.पी.एस. लिज्ड लाईन कार्यरत आहेत.

- **मार्कनेट प्रकल्प**

  मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील २९४ मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

  राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामूल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहिती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहिती देवाण घेवाणसाठी लागणाऱ्या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

- **खालील कामकाजासाठी संगणक विभागाने ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वित केल्या आहेत.**
  - आंबा विकीरण सुविधेचा लॉट बुकींग
  - निर्यात सुविधा केंद्र, वाशी (VPF) ऑनलाईन बुकींग.
  - हॉट वॉटर सुविधा केंद्र, गोरेगाव ऑनलाईन बुकींग
  - शेतमालाचा खरेदीदार व विक्रेता यांची माहिती
  - व्हेजीटेबल निर्यात सुविधा केंद्र, वाशी.
  - कृषि निर्देशिका.
  - प्रस्तावित दौरे व प्रवास भत्ता देयक.
  - बाजार समिती व्यवसाय विकास आराखडा.
  - बाजार समिती अर्थसंकल्प.
  - खाजगी बाजारामध्ये येणारी शेतमालाची आवक व बाजारभाव याबाबत माहिती भरण्यासाठी.
  - साखर आयुक्तालयाच्या कामकाजासाठी टपाल संगणक प्रणाली.
  - पणन संचालनालयाच्या कामकाजासाठी टपाल संगणक प्रणाली.
  - पणन संचालनालयाच्या कलम १२ (१) कामकाजासाठी संगणक प्रणाली.
  - कांद्याची लागवड, उत्पादन व साठवणूक या माहितीसाठी नविन संगणक प्रणाली कार्यान्वित.
  - बाजार समिती स्तरावर कांद्याची होणारी खरेदी व साठवणूक.
  - कृषि पणन मित्र मासिकाच्या सभासद वर्गणीबाबत.

- टोल-फ्री सुविधेकरीता संगणक प्रणाली.
- बाजार समिती वार्षिक प्रशासकीय अहवाल.

- कृषि पणन मंडळाच्या मुख्यालयामध्ये अद्ययावत संगणक व वाय-फाय सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

- **डी.एम.आय, भारत सरकार यांचे कडून  संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता**

  डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत ॲगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणाऱ्या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डी.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहनभत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.२९ लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

- **कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांसाठी संगणक प्रशिक्षण**

  बाजार समित्यांमध्ये संगणकाचा परिपूर्ण वापर करणेसाठी बाजार समित्यांच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना यशदा येथे चार दिवसांचे संगणक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाअतंर्गत संगणकाचे महत्त्व, फायदे, हाताळणी, विंडोज, ईमेल, इंटरनेट व एम.एस.ऑफिस याबाबत प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दिले जाते. तसेच बाजार समित्यांसाठी तयार केलेले डेटा एन्ट्री सॉफ्टवेअरची उभारणी व हाताळणी याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली जाते. याशिवाय संगणक उभारणी नंतरही प्रत्यक्ष बाजार समितीमध्ये येणाऱ्या अडचणी / तक्रारींवर सुधारणांबाबत मार्गदर्शन करण्यात येते. आतापर्यंत पणन मंडळाने विविध बाजार समित्यांच्या १३०० अधिकारी व कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण दिले आहे.

- **सांख्यिकीय माहिती**

  बाजार समित्यांकडून प्राप्त होत असलेले मासिक, वार्षिक बाजारभाव व आवक, तसेच बाजार समित्यांची इतर सर्वसाधारण माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेसचा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच वेब साईट डाटाबेसला उपलब्ध असलेली बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकतेप्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## १. बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी प्रशिक्षण

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना कृषि पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे , जि. पुणे या संस्थेत प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ३/१२/२०१५ ते ६/१२/२०१५ दरम्यान नागपूर विभागातील सभापती व पदाधिकारी यांचेसाठी कायदे विषयक प्रशिक्षण तळेगाव येथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास एकूण २१ सभापती / पदाधिकारी उपस्थित होते.

## २. 'कृषि पणन मित्र' मासिक

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला 'कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्यास वर्गणीदार,कृषि उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य शासनाच्या विविध योजना, सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.
अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :

| अ.क्रं. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१५ | १६५५४ |
| २. | मे २०१५ | १८६३१ |
| ३. | जून २०१५ | १९३४३ |
| ४. | जुलै २०१५ | १७९६९ |
| ५. | ऑगस्ट २०१५ | १६९११ |
| ६. | सप्टेंबर २०१५ | १६७५५ |
| ७. | ऑक्टोबर २०१५ | १६४७२ |
| ८. | नोव्हेंबर २०१५ | १७११६ |
| ९. | डिसेंबर २०१५ | १७३५० |
| १०. | जानेवारी २०१६ | १७५५७ |
| ११. | फेब्रुवारी २०१६ | १९१०१ |
| १२. | मार्च २०१६ | १८७८७ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत. "कृषि पणन मित्र" मासिक शेतकरी व कृषि उद्योजक यांच्यापर्यत अधिक संख्येने पोहोचविणेकरीता मासिकाचे व्यावसायिकरण करण्याचे निर्णय घेण्यात आलेला असून 'कृषि पणन मित्र' अंकाचा पोस्टल परवाना व डब्ल्यू.पी.पी. परवान्याची मुदत डिसेंबर

२०१५ ला संपल्यामुळे त्याचे चालू आर्थिक वर्षामध्ये जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१८ असे नूतनीकरण करुन घेण्यात आले.

## ३. 'कृषि पणन योजना' पुस्तिका

कृषि पणन योजना पुस्तिकेची सन २०१५ मध्ये प्रथम आवृत्ती प्रकाशित करण्यात आली, सदर पुस्तिकेमध्ये पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, समन्वयीत कृषि विकास योजना, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एन.सी.डी.सी., अपेडा, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान इ. च्या योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तिकेच्या प्रथम आवृत्तीचे वितरण करण्यात आलेले आहे. सन २०१६ मधिल सुधारित आवृत्तीचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे.

## ४. दिनदर्शिका २०१६

सन २०१६ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका छपाई करुन त्यांच्या प्रति मंत्रालय, राज्यातील बाजार समित्या व पणन मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सदर दिनदर्शिकेचा उपयोग होत आहे.

## ५. प्रदर्शन सहभाग

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांनी करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून याबाबतची माहिती विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होवून कृषी पणन मंडळातर्फे संबंधितांना देण्यात येते. तसेच सदर प्रदर्शनामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये कृषि प्रदर्शनासाठी झालेल्या खर्चास व नियोजित प्रदर्शन खर्चास मंजूरी घेण्यात आली. अहवाल वर्षात मंडळ खालील प्रदर्शनामध्ये सहभागी झाले ;

| अ.क्रं. | प्रदर्शनाचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | कृषि फलोत्पादन परिषद | कामा हॉल, लायन गेट समोर, फोर्ट, मुंबई | ६ ऑगस्ट २०१५ |
| २. | संत्रा महोत्सव | कृ.उ.बा.स.वरुड, जि. अमरावती | १ ते ४ ऑक्टोबर २०१५ |
| ३. | ॲग्री एक्स्पो. ॲग्रोवन | एच.ए. स्पोर्टस ग्राउंड, जि. पुणे | २३ ते २७ ऑक्टोबर २०१५ |
| ४. | कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शन | भाजीपाला मार्केट, बाजार समिती आवार, कराड, जि. सातारा | २४ ते २८ नोव्हेंबर २०१५ |
| ५. | किसान २०१५ | मोशी, जि. पुणे | १६ ते २० डिसेंबर २०१५ |
| ६. | "ॲग्रोव्हिजन ७ वे" | रेशीम बाग ग्राउंड, जि. नागपूर | ११ ते १४ डिसेंबर २०१५ |
| ७. | कृषि प्रदर्शन | जिल्हा परीषद, जि. चंद्रपूर | ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१६ |
| ८. | युथ एम्पॉवरमेंट समिट (फॉर्च्यून फाउंडेशन) | माणकापूर स्पोर्टस ग्राउंड,नागपूर | ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०१६ |
| ९. | कृषि वैभव प्रदर्शन | उरळी कांचन, जि. पुणे | ४ ते ७ फेब्रुवारी २०१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | ॲग्रोवर्ल्ड (कृषि, पशू व दुग्ध संवर्धन) | धुळे | १२ ते १५ फेब्रुवारी २०१६ |
| ११. | फ्लोरा एक्स्पो २०१६ (मेडिया टुडे मार्फत) | एच.ए. स्पोर्टस ग्राउंड, पुणे | २६ ते २८ फेब्रुवारी २०१६ |

## ६. प्रदर्शन / कार्यशाळा / परिषद आर्थिक मदत

आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य देणे कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. या अनुषंगाने सन २००१ सभा क्रं. ७२ मध्ये राज्यातील कृषि विद्यापिठे , विद्यापिठे, कृषि महाविद्यालये, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था (असोसिएशन / सोसायटी) कृषि उत्पन्न बाजार समिती, कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था, कृषि क्षेत्र आणि कृषि पणन क्षेत्राशी निगडीत शासकीय, निमशासकीय संस्था यांना कृषि आणि कृषि पणन विषयक चर्चासत्र, कृतिसत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन, इ. साठी येणा-या खर्चाच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. १५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्याबाबत ठरावाला मंजूरी देण्यात आली व यांबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना देण्यात आले आहेत. या ठरावाच्या अनुषंगाने सन २०१५-१६ मध्ये ठरावास अनुसरुन व त्यापुढील जादा आर्थिकसहाय्यास मा. अध्यक्ष व संचालक मंडळ सभेच्या मंजुरीने मान्यता देण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्रं. | संस्थेचे नांव/मासिकाचे नांव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | ॲग्रोव्हिजन , नागपूर | कृषि प्रदर्शन | १०/- लाख |
| २. | कृ.उ.बा.स., कराड | कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शन | ४.५१/- लाख |
| ३. | डॉ. बाळासाहेब कोकण कृषि विद्यापिठ, दापोली, जि. रत्नागिरी | इंटरनॅशनल सेमिनार | ५०,०००/- |
| ४. | ॲग्रोवर्ल्ड, धुळे | कृषि प्रदर्शन | ३०,०००/- |
| ५. | यूथ एम्पॉवरमेंट समिट, नागपूर | परिषद | १/- लाख |
| ६. | फ्लोरा एक्स्पो (मेडिया टु डे) | कृषी प्रदर्शन | १/- लाख |
| ७. | कृषि विकास, अमरावती | कृषी प्रदर्शन | ५०,०००/- |
| ८. | कृषि सन्मान पुरस्कार | कृषि पुरस्कार | १/- लाख |

प्रदर्शन, प्रशिक्षण, चर्चासत्र, कृतिसत्रे यांच्या आयोजन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अशा परिस्थितीत संस्थांना द्यावयाच्या आर्थिक निधीमध्ये वाढ करणे आवश्यक वाटल्याने दिनांक १२/२/२०१६ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभा क्रं. १२२ मध्ये पूर्वी पारीत झालेल्या ठरावातील अटी व शर्ती तशाच ठेवून देण्यात येणा-या आर्थिक मदतीमध्ये येणा-या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- यापैकी कमी असणारी रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली.

## ७. कृषि पणन मंडळ जाहिरात

कृषि पणन मंडळाची खालील मासिकात व पोस्टाच्या कॅलेंडरसाठी जाहिरात देण्यात आली . मासिकातील व पोस्टातील जाहिरातीमुळे पणन मंडळास विविध भागातून उदा. ग्राम पातळीवर, शहर पातळीवर प्रसिध्दी मिळते तसेच पणन मंडळाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव/मासिकाचे नांव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | शेतक-यांचा सूर्य | पुस्तक विशेषांक | २५,०००/- |
| २. | दि पुणे पोस्ट अँन्ड टेलिकॉम को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. पुणे, कॅलेंडर, सन २०१६ | पोस्ट दिनदर्शिका | ९०००/- |

## ८. प्रसिद्धी

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

## ९. लेख प्रसिध्दी

कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात प्रसिध्द करण्यात आले असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखाचे नाव | प्रसिध्दी महिना |
|---|---|---|
| १. | आंबा प्रक्रिया | एप्रिल २०१५ |
| २. | हळद लागवड व प्रक्रिया | एप्रिल २०१५ |
| ३. | अन्न प्रक्रिया - शेतक-यांसाठी संधी | एप्रिल २०१५ |
| ४. | भाज्या टिकवून ठेवण्याच्या घरगुती पध्दती | एप्रिल २०१५ |
| ५. | खरीप कांदा लागवड तंत्रज्ञान व विक्री व्यवस्थापन | मे २०१५ |
| ६. | हवामान आधारित पथदर्शक फळ पीक विमा योजना | मे २०१५ |
| ७. | शेतमाल साठवणुकीसाठी वखार आपल्या दारी ! | मे २०१५ |
| ८. | रत्नागिरी कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेचा 'काजूप्रक्रिया उद्योग' | जून २०१५ |
| ९. | सामर्थ्य आहे चळवळीचे, सहकार जनरेशन नेक्स्ट | जून २०१५ |
| १०. | शेतक-यांचा 'गुड टू इट' प्रक्रिया उद्योग | जून २०१५ |
| ११. | शेतकरी उत्पादक कंपनी म्हणजे काय रे भाऊ....! | जुलै २०१५ |
| १२. | सुगंधी वनस्पतींचे उपयोग | जुलै २०१५ |
| १३. | सेंद्रिय शेती उत्पादनाची निर्यात | जुलै २०१५ |
| १४. | फळे व भाजीपाल्याची तापमान नियंत्रित साठवणूक | ऑगस्ट २०१५ |
| १५. | शेतमाल तारण कर्ज योजना | ऑगस्ट २०१५ |
| १६. | प्रक्रिया उद्योग एक संधी | ऑगस्ट २०१५ |
| १७. | अन्न प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशिनरी | ऑगस्ट २०१५ |
| १८. | द्राक्ष – काढणी, हाताळणी, पॅकिंग आणि साठवणूक | ऑगस्ट २०१५ |
| १९. | केळी निर्यातीसाठी काढणीपूर्व व काढणीपश्चात तंत्रज्ञान | सप्टेंबर २०१५ |
| २०. | सोयाबीन आधारित प्रक्रिया उद्योगाची आवश्यकता | सप्टेंबर २०१५ |

| अ.क्र. | लेखाचे नाव | प्रसिध्दी महिना |
|---|---|---|
| २१. | कडधान्य डाळ निर्मिती – एक ग्रामीण उद्योग | सप्टेंबर २०१५ |
| २२. | फुलांचे- काढणी पश्चात तंत्रज्ञान व विपणन | ऑक्टोबर २०१५ |
| २३. | फळे व भाजीपाला जास्त काळ टिकविण्याच्या पध्दती | नोव्हेंबर २०१५ |
| २४. | भाजीपाल्याच्या काढणीनंतरचं व्यवस्थापन | डिसेंबर २०१५ |
| २५. | महाराष्ट्राची कृषी निर्यात सद्यस्थिती व संधी | जानेवारी २०१६ |
| २६. | रब्बी कांदा लागवड तंत्र व पिक नियोजन | जानेवारी २०१६ |
| २७. | भारतातील कांदा निर्यात संधी व अडचणी | जानेवारी २०१६ |
| २८. | शेतकरी बाजार – शेतक-यांना थेट शेतमाल विक्रीची संधी | फेब्रुवारी २०१६ |
| २९. | महाराष्ट्रातून कृषी मालाची निर्यात- सद्यस्थिती व संधी | फेब्रुवारी २०१६ |
| ३०. | फळे, भाजीपाला व फुले निर्यातीसाठी आवश्यक गुणवत्ता मानके | फेब्रुवारी २०१६ |
| ३१. | कृषिमाल विकिरण प्रक्रिया व भविष्यातील संधी | फेब्रुवारी २०१६ |
| ३२. | अन्न पदार्थांकरिता गुणवत्ता मानके | फेब्रुवारी २०१६ |
| ३३. | फुले गुणवत्ता केंद्र | मार्च २०१६ |

तसेच दिनांक २६ मार्च २०१६ रोजी दै. ॲग्रोवन मध्ये “ शेतकरी गट, उत्पादक कंपन्यांना शेतकरी बाजाराची संधी ” व “ शेतकरी बाजार शेतकरी- ग्राहकांना फायदेशीर ” हे लेख प्रसिध्द करण्यात आले.

## १०. दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाचे खालील अधिका-यांचे कार्यक्रम प्रसारित करण्यात आले .

| अ.क्रं. | अधिका-याचे नांव व पदनाम | विषय | कार्यक्रम प्रसारण दिनांक | दूरदर्शन केंद्राचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | मा. श्री. मिलिंद आकरे, कार्यकारी संचालक | शेतमाल तारण योजना | ३०/७/२०१५ | मुंबई |
| २. | डॉ. भास्कर पाटील सहाय्यक सरव्यवस्थापक | उत्पादक ते ग्राहक थेट शेतमालाची विक्री | २१/१०/२०१५ | मुंबई |
| ३. | श्री. डी.एम. साबळे सहाय्यक सरव्यवस्थापक | कांदा साठवणूक व त्यावरील उपाय | ३१/१२/२०१५ | मुंबई |
| ४. | डॉ. भास्कर पाटील सहाय्यक सरव्यवस्थापक | शेतकरी आठवडे बाजार | २१/१०/२०१५ | पुणे |

## ११. प्रशिक्षण

अ) कृषि पणन मंडळात कार्यालयीन कामकाजाचे शनिवारी अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी विविध विषयातील तज्ञांचे व्याख्यान/विचार/मंथन/मार्गदर्शन/प्रात्यक्षिके इ. आयोजित करण्यात येतात. या प्रशिक्षणास कर्मचा-यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. या उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचारी यांचे ज्ञानात भर पडत असून प्रशिक्षणामुळे कामकाजामध्ये गतीमानता आणण्यास मदत होते. अहवाल वर्षात खालीलप्रमाणे निरनिराळ्या तज्ञ व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

| अ.क्रं. | दिनांक | व्याख्यानाचा विषय | व्याख्यात्याचे नांव |
|---|---|---|---|
| १. | २०/६/२०१५ | कृ.प.मं. अंतर्गत देशांतर्गत व्यापार व निर्यात चर्चासत्र | डॉ. भास्कर पाटील |
| २. | १/८/२०१५ | नियाम ॲग्रीकलचर मार्केटिंग | श्री. विनायक जे. राणे |
| ३. | ११/९/२०१५ | Food Digetion | श्री. माधव जोशी |
| ४. | १७/१०/२०१५ | E-Banking | श्री. सी. एल. जंगले/श्री. संतोष |
| ५. | ३०/१०/२०१५ | ERP Software | श्री. अमोल |
| ६. | ३१/१०/२०१५ | अधिकारी/ कर्मचारी गुणात्मक वृध्दी | श्री. श्रीराम भेंडे |

## १२. ग्रंथालय

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी तसेच पणन मंडळाशी संबंधित सर्व संस्था, तज्ञ, शास्त्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कृषी, पणन, आयात, निर्यात,तंत्रज्ञान, नवीन संशोधन इ. बाबतची नवनवीन माहिती / संशोधन/ जागतिक घडामोडी समजाव्यात, त्याचा तपशिल प्राप्त व्हावा यासाठी ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, संशोधनपर मासिके, अहवाल, सी. डी., प्रकल्प अहवाल इ. उपलब्ध असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच दरवर्षी विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात येत असून कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात.

**ग्रंथालयातील पुस्तकांची सद्दस्थिती**
एकूण पुस्तके – ३,९२०
मासिके – मराठी – १० इंग्रजी – २

ग्रंथालय नवनवीन पुस्तकांची खरेदी करुन अधिकाधिक माहितीपूर्ण आणि आधुनिक करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच विविध विषयांवरील वृत्तपत्रांमध्ये / मासिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचे विषयावार संकलन ग्रंथालयात करण्यात येते. इंटरनेटवरुनही विविध विषयांवरील माहिती आवश्यकतेनुसार पणन मंडळातील अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येते. ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँन्ड ॲग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज ११ दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रण काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते. तसेच सदर कात्रणांच्या प्रती व्हॉटस ॲप तसेच ई-मेल व्दारे संबंधितांना पाठविण्यात येतात. यामुळे कृषी पणन विषयक वृत्तपत्रांमधून आलेल्या बातम्यांची माहिती वरिष्ठांना होण्यास तसेच उपस्थित बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्यास मदत होत आहे.

# प) कृषि व्यापार विकास विभाग

पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून राज्यातील कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाला चांगला भाव मिळावा व चांगल्या प्रतीचा कृषि माल किफायतशीर दरामध्ये ग्राहकांना उपलब्ध व्हावा तसेच राज्यातील कृषि मालासाठी देशांतर्गत नवनवीन बाजारपेठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कृषि व्यापार विकास विभाग कामकाज करत आहे. त्याच बरोबर राज्यातील कृषि मालासाठी परराज्यातील बाजारपेठा उपलब्ध होण्यासाठी तसेच परराज्यातील कृषि माल शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यामातून राज्यातील ग्राहकांना रास्त दरात उपलब्ध करुन देणेकरीता तसेच शेतकऱ्यांमध्ये बाजार पेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. बाबत कृषि व्यापार विकास विभाग प्रयत्नशिल आहे.

## १) उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना:

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. चालू आर्थिक वर्षात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत आंबा उत्पादकांना आंबा विक्रीसाठी प्रादेशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे येथे स्टॉल्स उपलब्ध करुन देण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादकांनी सहभाग घेतला होता. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर आंबा विक्री झालेली आहे. चालू वर्षी दि.०७/०४/२०१६ पासून प्रत्यक्ष आंबा विक्रीला सुरवात झालेली असून आज अखेर अंदाजे रु. ३० ते ३२ लाखच्या ३९०० ते ४००० डझन आंब्याची विक्री झालेली आहे.

## २) फळ महोत्सव अनुदान योजना:

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना राज्यातील जास्तीत जास्त ठिकाणी राबविली जावी यासाठी राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट यांना फळ महोत्सव आयोजनासाठी कृषि पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात येते.

या आर्थिक वर्षात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत आंबा उत्पादकांना आंबा विक्रीसाठी मुख्यालयाचे रस्त्यालगत स्टॉल्स उपलब्ध करुन देण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादकांनी सहभाग घेतला होता. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर आंबा विक्री झालेली आहे.

**लाभार्थी** -राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट .

**नियम व अटी** –

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रतिस्टॉल रु.१,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवातील जाहिरात व प्रसिध्दीकरिता रक्कम रु.१०,०००/- इतके अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवामध्ये कृषि पणन मंडळाकरिता १०% स्टॉल मोफत देणे बंधनकारक राहील.

५. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
६. महोत्सवामध्ये स्टॉल उभारणीपोटी कंत्राटदाराला अदा केलेल्या व मिळालेल्या रक्कमेबाबतची अनुषंगिक कागदपत्रे पणन मंडळाकडे सादर करणे बंधनकारक राहील.
७. महोत्सवासाठी करण्यात आलेल्या एकूण खर्चाच्या ५०% किंवा कमाल रु.६०,०००/- महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी, रु.२०,०००/- जिल्हास्तरासाठी व रु.१०,०००/- तालुकास्तरासाठी यामध्ये कमी असणारी रक्कम अनुदान स्वरुपात देय होईल.
८. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा. बॅनर्स, जाहिरात, बातम्या, बॅकड्रॉप, हँण्ड बिल्स, इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे संस्थेवर बंधनकारक राहील.
९. संस्थेच्या सभासदांना कृषि पणन मित्र या मासिकाचे वर्गणीदार करावे लागेल.
१०. महोत्सवातील फळांची प्रत, दर व इतर अनुषंगिक बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही तथापि चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे स्टॉलधारकांवर बंधनकारक राहील, याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोजक संस्थेवर राहील. कोणत्याही परिस्थितीत कार्बाइड पावडरने पिकविलेला आंबा महोत्सावात विक्री होणार नाही याची खबरदारी घ्यावी. याबाबत तक्रार आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयोजकांची राहील.
११. महोत्सव अनुदानासाठीचा प्रस्ताव अपूर्ण असल्यास व अटी, शर्तीची पूर्तता न केल्यास अनुदान देय होणार नाही.
१२. महोत्सवासंदर्भातील कोणत्याही कराची मागणी आल्यास त्याकरिता कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही.
१३. महोत्सव हा फक्त फळ उत्पादकांकरिता असल्याने त्यामध्ये व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधून आणून कृषिमालाची विक्री करता येणार नाही असे आढळून आल्यास आयोजक संस्थेस अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.
१४. महोत्सवामध्ये विक्री होणाऱ्या फळांचा दर्जा हा चांगला असावा व त्याचे दर रास्त असावेत.
१५. महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकीय योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.
१६. विक्रीच्या स्टॉल्ससाठी अनुदान देय असल्याने अन्य स्टॉल्स अनुदानास पात्र असणार नाहीत.
१७. फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन विभागाच्या नियम व अटींचे पालन करण्याची जबाबदारी आयोजक संस्थेची तसेच विक्रेत्यांची राहील.
१८. नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.५०/- च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

## सन २०१५-२०१६ मध्ये फळ महोत्सव अनुदान वाटप केलेल्या संस्था / गट –

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना राज्यातील जास्तीत जास्त ठिकाणी राबविली जावी यासाठी राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट यांना फळ महोत्सव आयोजनासाठी कृषि पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात येते. ;

| अ.क्र. | संस्था / गटाचे नाव | महोत्सव कालावधी व ठिकाण | अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | स्वानंद महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.२०/०४/२०१५ ते दि.०८/५/२०१५ गोयल गंगा ग्रुप, सिंहगड रोड, पुणे | ६००००.०० |
| २. | स्वामिनी महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१०/५/२०१५ ते दि.२०/५/२०१५ महेश विद्यालय, कोथरुड, पुणे | ६००००.०० |
| ३. | धनश्री महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१६/४/२०१५ ते दि.२४/०४/२०१५ बालगंधर्व रंगमंदीर, पुणे | ६००००.०० |
| ४. | यशश्री बचत गट, पुणे | आंबा, दि.२५/०४/२०१५ ते दि.०१/५/२०१५ बालगंधर्व रंगमंदीर, पुणे | ६००००.०० |
| ५. | प्रकल्प संचालक (आत्मा), पुणे | धान्य व फळ, दि.२५/०४/१५ ते दि.२७/४/१५ कृषि भवन, पुणे | ५००००.०० |
| ६. | जिव्हाळा महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१२/०५/२०१५ ते दि.१६/५/२०१५ रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे | ५५०००.०० |
| ७. | मानीनी महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१७/०५/२०१५ ते दि.२१/५/२०१५ रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे | ५५०००.०० |
| ८. | स्वामीनी महिला स्वंयसहायता बचत गट, पुणे | आंबा, दि.०७/५/२०१५ ते दि.१२/५/२०१५ बालगंधर्व रंगमंदीर, पुणे | ६००००.०० |
| ९. | कीर्ती बचत गट, पुणे | आंबा, दि.०७/५/२०१५ ते दि.१५/५/२०१५ रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे | ५८०००.०० |
| १०. | जागृती महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१३/५/२०१५ ते दि.१८/५/२०१५ बालगंधर्व रंगमंदीर, पुणे | ६००००.०० |
| | | **एकूण** | **५,७८,०००** |

## ३) शहरी भागासाठी थेट शेतमाल विक्री योजना

शहरी भागासाठी थेट भाजीपाला पुरवठा योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतक-यांनी घेवून, भाजीपाला विक्रीमधील मध्यस्थांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करुन, ग्राहकांना ताजा ,योग्य वजनाचा, स्वच्छ भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध करुन द्यावा. तसेच भाजीपाल्याच्या दरामध्ये होणा-या अवाजवी भाव वाढीवर नियंत्रण ठेवावे हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शहरी भागातील भाजीपाला पुरवठा प्रकल्पाअंतर्गत भाजीपाला उत्पादन, काढणीपश्चात व्यवस्थापन व विक्री व्यवस्थापन घटकांची जोड या योजनेस दिली असून, या योजनेतील विक्री व्यवस्थापन घटक राबविणेसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे देण्यात आली आहे. सदर विक्री व्यवस्थापन घटकांतर्गत खालिल बाबींचा समावेश आहे;

१. संकलन व प्रतवारी केंद्र उभारणी .
२. वातावरण नियंत्रीत किरकोळ भाजीपाला विक्री केंद्र उभारणी.
३. मोटराईज्ड व्हेंडिंग कार्ट.
४. स्थायी / फिरते विक्री केंद्र उभारणी.

शहरी भागात भाजीपाला पुरवठा प्रकल्प योजना ही मुंबई, पुणे व नागपूर या तीन शहरासाठीच लागू असून, सदर तीन शहरांना भाजीपाला पुरवठा करणारे जिल्हे जोडुन दिले आहेतशहरी भागात भाजीपाला पुरवठा प्रकल्प .

योजना ही मुंबई, पुणे व नागपूर या तीन शहरासाठी लागू असून, सदर तीन शहरांना भाजीपाला पुरवठा करणारे जिल्हे खालील प्रमाणे आहेत;

१. पुणे शहर - पुणे, सातारा, सांगली , अहमदनगर व सोलापूर
२. मुंबई शहर - पुणे, नाशिक, ठाणे, रायगड, अहमदनगर.
३. नागपुर शहर – नागपूर, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, अमरावती, चंद्रपूर.

प्राप्त निधीतून मुंबई, पुणे व नागपूर शहरांसाठी विक्री व्यवस्थापन घटकातील ४ बाबींवर अनुदानासाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला असून, त्याची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे –

| शहर | विक्री व्यवस्थापनातील घटक | लाभार्थी संख्या | अनुदान वाटप रक्कम रु. |
|---|---|---|---|
| **मुंबई** | संकलन व प्रतवारी केंद्र | ४८ | ११०.४६ |
| | वातावरण नियंत्रित विक्री केंद्र | २ | ५.४० |
| | स्थाई / फिरते विक्री केंद्र | ०० | ०० |
| | मोटाराईज्ड व्हेंडींग कार्ट | १३ | २६.०० |
| | **मुंबई शहर एकूण - अ** | **६३** | **१४१.८६** |
| **नागपूर** | संकलन व प्रतवारी केंद्र | ४ | १४.९७ |
| | वातावरण नियंत्रित विक्री केंद्र | २ | ७.७२ |
| | स्थाई / फिरते विक्री केंद्र | ३ | ०.४५ |
| | मोटाराईज्ड व्हेंडींग कार्ट | ४१ | ८२ |
| | **नागपूर शहर एकूण - ब** | **५०** | **१०५.१४** |
| **पुणे** | संकलन व प्रतवारी केंद्र | १९ | ६८.८६ |
| | वातावरण नियंत्रित विक्री केंद्र | ३३ | ८०.५८ |
| | स्थाई / फिरते विक्री केंद्र | ८१ | ११.७७ |
| | मोटाराईज्ड व्हेंडींग कार्ट | ८२ | १६३.७३ |
| | **पुणे शहर एकूण - क** | **२१५** | **३२४.९४** |
| | **एकूण लाभार्थी / अनुदान** | **३२८** | **५७१.९४** |

## ४) शेतकरी बाजार

**संकल्पना** - महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ शेतकऱ्यांना आपला माल थेट ग्राहकांना विक्री करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. या अंतर्गत फळ महोत्सवांचे आयोजन तसेच फळे भाजीपाल्याची थेट ग्राहकांना विक्री यासाठी कृषि पणन मंडळ विविध उपक्रम राबवित आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करून खाजगी बाजार, थेट पणन, शेतकरी ग्राहक बाजार, एक परवाना पद्धत, कराराची शेती, टर्मिनल मार्केट इ. पर्याय शेतकऱ्यास कृषि माल विक्रीसाठी उपलब्ध करून दिलेले आहेत. यामध्ये शेतकऱ्यास शेतीमाल विक्रीसाठी पर्याय मिळणेबरोबरच कृषिमाल विक्रीमध्ये पारदर्शकता, मध्यस्थांची संख्या कमी करणे, शेतमाल विक्री खर्च कमी करणे हे उद्देशही आहेत. मात्र या सर्वच ठिकाणी थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची सुविधा नाही. तसेच सद्यस्थितीतील बाजार यंत्रणेमध्ये शेतमाल विविध घटकांकडे जात असतांना सदर शेतमालाची जबाबदारी कोणीही घेत नाही, शेतमालाचे नुकसान झाल्यास तोटा किंवा नुकसानीची जबाबदारी शेतकऱ्यांवर टाकली जाते, मध्यस्थांच्या मोठ्या साखळीमुळे तसेच बाजार घटकांच्या वेगवेगळ्या कामांमुळे, जसे हमाली,

तोलाई, भराई, गाडी भाडे इ. आकारांमुळे किंमतीतील बराचसा वाटा विविध घटकांकडे जातो. बाजार समित्यांमध्ये शेतमालाचे दर ठरविणे आणि वजन याबाबत पूरेशी पारदर्शकता नसणे, तसेच बाजार आवारांमध्ये पुरेशी स्वच्छता नसल्यामुळे कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये बऱ्याचशा त्रुटी दिसून येतात.

अशा परिस्थितीत शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या यांचेकडून भाजीपाला थेट ग्राहकांना विक्रीसाठी वेगळे पर्याय उपलब्ध करून देणेबाबत सातत्याने मागणी होत होती. सदर बाबीचा विचार करून कृषि पणन मंडळाने शेतकरी बाजार ही संकल्पना पुणे येथे शहरात राबविण्याचा निर्णय घेतला आणि दि.२९ जून, २०१४ रोजी गांधी भवन, कोथरूड येथे राज्यातील पहिला शेतकरी बाजार सुरू केला. आजमितीस पुणे शहरामध्ये एकूण २३ शेतकरी बाजार सुरु झालेले आहेत पैकी ज्या जागा मालकांनी पणन मंडळास शेतकरी बाजारासाठी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत अशा ६ शेतकरी बाजारांच्या आयोजनासाठी स्वामी समर्थ शेतकरी बचत गट, राधाबाई शेतकरी महिला बचत गट व शाश्वत कृषि विकास गट या गटांना पणन मंडळाने परवानगी दिलेली आहे. तसेच उर्वरीत बाजारांच्या जागा आवश्यक त्या सर्व सुविधांसह पणन मंडळास उपलब्ध करुन देणेबाबत महानगरपालिका पुणे व पिंपरी चिंचवड यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. लवकरच सदर जागा पणन मंडळास उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे. याच धर्तीवर नागपूर शहरात २, तर मुंबई मध्ये १ असे एकूण राज्यात २६ शेतकरी बाजार सुरू आहेत. लवकरच औरंगाबाद येथे २ व मुंबई येथे १ असे एकूण ३ शेतकरी बाजार सुरु करण्यात येत आहेत. याशिवाय नाशिक, जळगांव, बीड, अहमदनगर, कोल्हापूर व अमरावती येथे शेतकरी बाजार सुरु करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच शेतकरी बाजारात शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना टेन्ट, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, क्रेट्स खरेदीवर ५० टक्के अनुदान देण्याचा, शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी येणाऱ्या खर्चास आणि शेतकरी बाजार सुरु करण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी, फ्लेक्स, पँम्प्लेट इ. साठी प्रति बाजार रु.५०,०००/- खर्चास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. शेतकरी बाजारांच्या आयोजनासंदर्भात नियमावली निश्चित केलेली असून ती खालील प्रमाणे ;

## शेतकरी बाजार नियमावली

### अ) आयोजकांसाठी नियम / अटी / शर्ती

१. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी कोणाचा माल किती कालावधीसाठी विक्री करणार याबाबतचा तपशील शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांच्या /सभासदांच्या सध्याच्या ७/१२ च्या उताऱ्यासह पणन मंडळास तसेच शेतकरी बाजार आयोजकास शेतकरी बाजारामध्ये विक्रीसाठी परवानगी मिळण्यासाठीच्या अर्जासोबत दाखल करावा. तसेच शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

२. फक्त शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांच्या सभासदांचाच माल थेट ग्राहकांना वाजवी दरात विक्री करण्यात येईल असे हमीपत्र अर्जासोबत देणे आवश्यक राहील. विक्रेत्यावर उत्कृष्ठ प्रकारचा माल विक्रीचे बंधन असेल. याबाबतचा उल्लेख हमीपत्रात करावा लागेल.

३. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था हे आपला / सभासदांचा उत्पादित माल शेतकरी बाजारात विक्री करतील. येथील विक्री थेट ग्राहकांनाच असेल. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था शेतमालाची खरेदी विक्री आपआपसात शेतकरी बाजारात करणार नाहीत.

४. शेतकरी बाजारात विक्रीसाठी पणन मंडळाची पूर्वपरवानगी आवश्यक राहील. आयोजकांना परवानगी नसलेल्या शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांना परस्पर

विक्रीसाठी परवानगी देता येणार नाही. काही अपरिहार्य परिस्थितीत आयोजकांना विक्रीसाठी परवानगी द्यावी लागल्यास याबाबतची माहिती पणन मंडळास देवून पुढील वेळी परवानगीशिवाय संबंधितांना विक्रीसाठी परवानगी देवू नये.

५. प्रत्येक शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांना सर्वांना समान तत्वावर जागा वाटप करण्याची जबाबदारी आयोजकांची राहील. एका शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांना विक्रीसाठी एकच गाळा / जागा देण्यात येईल.

६. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांच्या जागा बदलविण्याचे अधिकार आयोजकास असतील. तथापि, सर्व शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था या सर्वांसाठी जागा बदलविण्याचे नियम व अटी या सारख्याच असतील. प्रथम येणाऱ्यास (शेतमालासह) प्रथम प्राधान्य अथवा चिठ्ठी पद्धतीने अथवा रोटेशन पद्धतीने स्टॉल / जागेचे वाटप करणे आयोजकांवर बंधनकारक राहील. जागेचे न्याय्य वाटप करण्याची जबाबदारी आयोजकांवर राहील.

७. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी आठवड्यातील किती शेतकरी बाजारात शेतमालाची विक्री करावी याबाबत (शेतकरी बाजार संख्या/स्थळ) पणन मंडळ शहरांनुसार बाजारांची संख्या निश्चित करून देईल. जास्तीत जास्त शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांना शेतकरी बाजारात माल विक्रीची संधी देण्याचे धोरण राबविण्यात येईल.

८. आयोजकांनी जागेचे भाडे, टेबल, खुर्च्या, पिण्याचे पाणी, लाईट व्यवस्था, कचरा निर्मूलन, जागेची साफसफाई, अभ्यांगत, पार्किंग नियोजन, सुरक्षा, प्रचार, प्रसिद्धी इ. च्या खर्चासाठी शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था तसेच इतर विक्रेते यांचेकडून वाजवी रक्कम आकारावी. प्रत्येक आठवड्यात आयोजित शेतकरी बाजाराचा जमा आणि खर्चांच्या रक्कमांचा हिशेब आयोजकांनी ठेवणे बंधनकारक राहील. कृषि पणन मंडळास सदर हिशेब आठ दिवसांच्या आत सादर करण्याची जबाबदारी आयोजकांवर राहील. तसेच सहभागी विक्रेत्यांनी मागणी केल्यास सदर हिशेब संबंधितांना देणे बंधनकारक असेल. आयोजक प्राप्त रक्कमेमधून सेवाशुल्क म्हणून एकूण प्राप्त रक्कमेपैकी २० टक्के रक्कम ठेवू शकतील.

९. कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यापारी / किरकोळ विक्रेते शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणार नाहीत याची जबाबदारी आयोजकांची राहील.

१०. शेतकरी बाजारात जास्तीत जास्त ५० स्टॉल्स असावेत. त्यापैकी सुमारे ४० स्टॉल्स (८० टक्के) हे शेतमालाच्या (भाजीपाला/फळे/डाळी/कडधान्य/दुध) विक्रीसाठी असणे आवश्यक राहील. सुमारे १० स्टॉल्स (एकूण स्टॉलच्या संख्येच्या २० टक्के) खाद्यपदार्थ/पापड/ लोणचे/मसाले/दुग्धजन्य पदार्थ/प्रक्रियायुक्त पदार्थ इ. मालाच्या विक्रीसाठी देता येतील. तथापि, सदर स्टॉल्सची संख्या एकूण स्टॉल्सच्या संख्येच्या २० टक्के पेक्षा जास्त ठेवता येणार नाही.

११. शेतकरी बाजार आयोजक म्हणून शेतकरी गट / उत्पादक कंपन्या / उत्पादक सहकारी संस्था कामकाज करू शकतील. खाजगी व्यक्ती / बचत गट / एन.जी.ओ. तसेच इतर संस्थांना अथवा वैयक्तिकरित्या शेतकरी बाजार सुरू करण्यास पणन मंडळातर्फे मान्यता देण्यात येणार नाही.

१२. "शेतकरी बाजार" सुरू करण्यासाठी शेतकरी गट / उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी शेतकरी बाजार सुरू करण्याची परवानगी मागतांना शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणारे शेतकरी / शेतकरी गट / कंपन्या यांची संमती पत्र नोंदणीच्या प्रमाणपत्रासह तसेच इतर आवश्यक कागदपत्रांसह कृषि पणन मंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

१३. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी ग्राहकांशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करावेत. ग्राहकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही / ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची जबाबदारी विक्रेत्यांची राहील. शेतकरी बाजार परिसरात धूम्रपान / मद्यपान करू नये तसेच ग्राहकांशी कोणत्याही प्रकारे गैरवर्तन करू नये. याबाबत तक्रारी आल्यास त्यावर प्राधान्याने आयोजकांनी कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीबाबत पणन मंडळास कळवावे.

१४.प्रत्येक शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी स्टॉलवर आपला / संस्थेचा फलक / फ्लेक्स लावणे बंधनकारक राहील. फलकावर शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांच्या प्रमुखाचे नाव आणि मोबाईल नंबर टाकावा. तसेच शेतमालाच्या बाजार भावाचा फलक स्टॉलमध्ये दर्शनिय ठिकाणी लावणे बंधनकारक राहील.

१५. शेतकरी बाजारामध्ये सहभागी शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांची यादी त्यांच्या शेतमालाच्या विक्रीसह तसेच अंदाजित किंमतींसह कृषि पणन मंडळाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल. सदर माहिती कृषि पणन मंडळास ईमेलद्वारे पुरविणे आयोजकांवर बंधनकारक असेल.

१६. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा कृषि पणन अधिकारी आणि कृषि पणन तज्ञ यांच्या मदतीने विविध शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांचा शेतमाल विक्रीतील सहभाग वाढविणेची जबाबदारी तसेच जास्तीत जास्त शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था थेट शेतमाल विक्रीत सहभागी करण्याची जबाबदारी आयोजकांची राहील.

१७.आयोजक शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांचेकडून शेतकरी बाजाराच्या मुळ संकल्पनेस बाधा पोहोचत असल्याचे लक्षात आल्यास संबंधित आयोजकांकडून शेतकरी बाजाराचे कामकाज काढून घेण्याचा अधिकार कृषि पणन मंडळास राहील.

१८. काही मुलभूत शेतमालाच्या किंमती शेतकरी बाजारातील सहभागी शेतकऱ्यांच्या सहमतीने निश्चित करण्याचा अधिकार आयोजकास राहील.

१९. आयोजकांनी शेतकरी बाजारामध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा फ्लेक्स लावणे बंधनकारक राहील. फ्लेक्सवर कृषि पणन मंडळाचा पत्ता,फोन नं., ई- मेल, संपर्क अधिका-याचे नांव, मोबाईल नं., ई- मेल इ. चा तपशिल द्यावा. शेतकरी बाजाराच्या संदर्भातील सूचना, तक्रारी, तसेच ग्राहकांचे म्हणणे यांची नोंद ठेवण्याची जबाबदारी आयोजकांची राहील.

२०. ग्राहक / शेतकरी/ शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपन्या/ उत्पादकांच्या सहकारी संस्था तसेच इतर शेतकरी बाजाराशी संबंधित घटक यांनी त्यांच्या शेतकरी बाजारा संदर्भातील सूचना / तक्रारी आयोजकांकडे द्याव्यात. तसेच याबाबत कृषि पणन मंडळाकडेही संपर्क साधावा.

**ब) शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांचेसाठी नियमावली (जबाबदारी)**

१. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी आपला/आपल्या सभासदांचाच शेतमाल शेतकरी बाजारामध्ये विक्रीसाठी आणणे बंधनकारक राहील.

२. कृषि उत्पन्न बाजार समिती अथवा इतर ठिकाणांहून खरेदी केलेला शेतमाल शेतकरी बाजारात विक्री करता येणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधिताची परवानगी रद्द करण्यात येईल.

३. शेतकरी बाजारात फक्त ग्राहकांनाच मालाची विक्री करणे शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांना बंधनकारक राहील. शेतकरी बाजारात शेतमालाची घाऊक विक्री करता येणार नाही.

४. शेतमालासोबत येणारा काडी /कचरा /घाण /शिल्लक माल शेतकरी बाजारातून परत नेण्याची जबाबदारी शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांची राहील. शेतमाल विक्रीनंतर कचरा शेतकरी बाजारात टाकून गेल्याचे आढळल्यास दंड आकारण्याचे अथवा शेतमाल विक्रीसाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याचे अधिकार आयोजकास राहतील.

५. शेतकरी बाजारात शेतमालाचे वजन करणेसाठी इलेक्टॉनिक वजन काट्याचा वापर करणे विक्रेत्यांवर बंधनकारक राहील.

६. शेतकरी बाजारात किरकोळ विक्रेत्यांपेक्षा कमी दराने शेतमालाची विक्री होणे आवश्यक आहे. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था वाजवी दराने शेतमालाची विक्री करीत नसल्याचे आढळून आल्यास त्यांची विक्रीसाठीची परवानगी रद्द करण्यात येईल.

७. शेतकरी बाजारात उत्कृष्ठ दर्जाचा माल विक्री होणे आवश्यक आहे. कच्चा, अति पक्व, किडलेला, रोगग्रस्त, फुटलेला (ग्राहक खरेदी करू शकणार नाही असा माल) असा शेतीमाल विक्रेत्यांनी विक्रीसाठी आणू नये. असा शेतमाल विक्रीसाठी आणलेला आढळल्यास सदर मालाची विक्री थांबविण्यात येईल. तसेच संबंधित विक्रेत्याची शेतकरी बाजाराची परवानगी रद्द करण्यात येईल.

८. शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांनी शेतमाल विक्रीचे व्यवहार रोखीने करणे बंधनकारक राहील. उधारीने व्यवहार केल्यास आणि नंतर रक्कमेची वसुली न झाल्यास त्यास आयोजक अथवा कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही.

९. विक्री अभावी शिल्लक राहिलेल्या शेतमालाची जबाबदारी ही संबंधित शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / उत्पादक सहकारी संस्था यांची राहील. आयोजक अथवा कृषि पणन मंडळ शिल्लक मालास जबाबदार नसतील.

१०. परदेशातून आयात केलेल्या शेतमालाच्या विक्रीसाठी (फळे/भाजीपाला) स्वतंत्र परवानगी घेणे शेतकरी बाजारातील विक्रेत्यांवर बंधनकारक राहील.

११. शेतकरी बाजारासंदर्भात काही अडचणी/ सूचना/ तक्रारी असल्यास त्याबाबतचा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**शेतकरी बाजारांची तपासणी**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे राज्यात १०० शेतकरी बाजार सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन त्या दृष्टीकोनातुन कार्यवाही करण्यात येत आहे. पुणे शहरामध्ये सद्यस्थितीत सुमारे २५ शेतकरी बाजार हे विविध वारी, विविध गट व शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यामार्फत आयोजित करण्यात येत आहेत. तथापि, सदर शेतकरी बाजार हे कृषि पणन मंडळाच्या संकल्पनेनुसार कार्यरत आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करणे आवश्यक असल्याकारणाने तसेच या संकल्पनेचा चुकीच्या मार्गाने वापर होऊ नये, कृषि पणन मंडळाचे या बाजारांवर नियंत्रण असावे, या बाजारांमध्ये शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व उत्पादकांच्या सहकारी संस्था यांच्या मार्फतच शेतमालाची विक्री व्हावी, ग्राहकांनाही योग्य वजनाचा व चांगल्या दर्जाचा माल वाजवी भावात उपलब्ध व्हावा, इ. बाबी या शेतकरी बाजारामध्ये होणे अपेक्षीत असल्याने पुणे शहरात कार्यरत असलेल्या शेतकरी बाजारांची तपासणी करण्यात आलेली असून सदर बाजारांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रूटी / अपुर्ततेबाबत संबंधित बाजार आयोजकांना सदर त्रूटींची पुर्तता करणेबाबत कळवून त्यांची पुर्तता करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

## ५) प्रशिक्षण

- **शेतकरी बाजारा संदर्भात शेतकऱ्यांचे प्रशिक्षण**

शेतकरी बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार चालविण्याचे तसेच बाजारात येणाऱ्या ग्राहकांबरोबर कसे वागावे, सलोख्याचे संबंध कसे प्रस्थापित करावेत, शेतमालाची विक्री कशी करावी, शेतमालाची माहिती कशी द्यावी, वजनाची हमी, भावाबाबत माहिती देणेकरीता तसेच संपूर्ण बाजाराच्या आयोजनाबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी कृषि पणन मंडळात प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. सदर प्रशिक्षण विनामूल्य असून शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कृषि पणन मंडळातर्फे करण्यात येतो.

या अंतर्गत नागपूर विभागातील १५ शेतकऱ्यांना तर औरंगाबाद विभागातील २५ शेतकऱ्यांना असे एकूण ४० शेतकऱ्यांना शेतकी बाजाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

- **बाजार समित्यांचे पदाधिकारी तसेच पणन मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण**

राष्ट्रीय कृषि विपणन संस्था (नियाम), जयपुर राजस्थान व नॅशनल इंस्टीट्युट ऑफ ॲग्रीकल्चरल एक्सटेंशन मॅनेजमेंट (मॅनेज), हैद्राबाद, अपेडा, आय.आय.एफ.टी., एन.सी.सी.डी. व कर्नाटक इन्स्टीट्युट ऑफ ॲग्रीकल्चरल मार्केटींग इ. या संस्थांतर्फे कृषि पणन संदर्भातील विविध विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या अंदाजे २५ सचिवांना, ३१ पदाधिकारी व पणन मंडळाचे २४ अधिकारी / कर्मचारी यांना कृषि पणन संदर्भातील वेगवेगळ्या विषयावरील प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच नागपूर विभागातील २१ सभापतींचे प्रशिक्षण एन.आय.पी.एच.टी. येथे पूर्ण करण्यात आले आहे. भविष्यात राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतमाल निर्यात तसेच शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व संबंधीत विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम पणन मंडळाचे मुख्यालय येथे पणन मंडळामार्फत देणेबाबतचे नियोजन करण्यात येत आहे. कृषि पणन मंडळाच्या सर्व कर्मचारी / अधिकारी यांना प्रशिक्षणासाठी पाठविणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. माहे एप्रिल व मे २०१६ मध्ये मॅनेज, हैद्राबाद या संस्थेने Linking Farmers to Market आणि Supply Chain Management in Agricultural and Allied Sector या दोन विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत केलेले आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास पणन मंडळाचे ८ – १० अधिकारी / कर्मचारी पाठविणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

## ६) स्थानिक बाजारपेठ विकास

- **केरळ राज्याशी केलेला MOU**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, अंतर्गत कृषि समृध्दी समन्वयित कृषि विकास प्रकल्प हा सर रतन टाटा ट्रस्ट व आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी यांचे संयुक्त विद्यमाने विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा व यवतमाळ या सहा जिल्ह्यातील ६४ तालुक्यातील १६०९ गावांतील नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता राबविण्यात येत आहे. कृषि समृध्दी प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात ७० गावामधील १२०० संत्रा उत्पादक शेतकरी आहेत. सदरील संत्रा उत्पादक शेतकरी महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्राहकास थेट विक्री करण्याकरिता इच्छुक आहेत. यासाठी आंन्ध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पंजाब व तामिलनाडू इ. राज्यांतील कृषि पणन मंडळ व संबंधित राज्याचे पणन संचालक यांना त्यांच्या राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये थेट विक्री करीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने केरळ राज्यातील WTO सेल यांनी केरळ राज्यातील संचालक, कृषि यांचेशी कृषि पणन मंडळाने सामंजस्य करार करणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

- **राज्यातील इतर जिल्ह्याच्या ठिकाणी शेतकरी बाजार सुरु करणे**

पुणे शहरामध्ये एकूण २३ शेतकरी बाजार सुरु झालेले आहेत याच धर्तीवर नागपूर शहरात २, तर मुंबई मध्ये १ असे एकूण राज्यात २६ शेतकरी बाजार सुरू आहेत. लवकरच औरंगाबाद येथे २ व मुंबई येथे १ असे एकूण ३ शेतकरी बाजार सुरु करण्यात येत आहेत. याशिवाय नाशिक, जळगांव, बीड, अहमदनगर, कोल्हापूर व अमरावती येथे शेतकरी बाजार सुरु करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

- **आंबा विक्रीसाठी स्टॉल**

पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. चालू वर्षी सन २०१६ मध्ये पणन मंडळामार्फत मुख्यालयाच्या रस्त्यावर आंबा महोत्सवासाठी ३५ स्टॉल उभारण्यात आले आहेत. सदर योजनेस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून ग्राहकांना उत्तम प्रतिचा नैसर्गिकरित्या पिकविलेला आंबा रास्त दरात उपलब्ध होत आहे. यामुळे शेतकऱ्यांबरोबर ग्राहकांचाही फायदा होत आहे. चालू वर्षी आंबा विक्रीसाठी राज्यात १०० विक्री केंद्र सुरु करण्याचे नियोजन आहे. याकरीता पणन मंडळाच्या सर्व जिल्हा कार्यालयांना याबाबत नियोजन करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. दि.०७/०४/२०१६ रोजी मनोरा गेस्ट हाऊस, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते आंबा बाजाराचे उद्घाटन करण्यात आले. तसेच दि.१५/०४/२०१६ रोजी पणन मंडळाचे मुख्यालयासमोरील आयोजीत आंबा महोत्सवाचे उद्घाटन मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग व सार्वजनीक बांधकाम तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

- **आंतरराज्य विक्री व्यवस्थापन**

या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला भाजीपाला व फळे हे इतर राज्यातील कृषि पणन मंडळाच्या सहकार्याने विक्रीसाठी पाठविणे व परराज्यातील शेतकऱ्यांचा माल थेट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

- **संत्रा विक्री**

सन २०१५ ऑक्टोबरपासून संत्र्याच्या उत्पादक ते ग्राहक विक्रीचा उपक्रम सुरु करण्यात आला असून या उपक्रमाअंतर्गत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राज्यातील औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, नाशिक, सातारा, सांगली, ठाणे, सोलापूर व रायगड येथे उत्पादक ते ग्राहक थेट संत्रा विक्री केंद्र उभारुन शेतकऱ्यांसाठी संत्रा विक्रीसाठीची व्यवस्था करण्यात आली. सदर उपक्रमाअंतर्गत सर्व केंद्रावरुन अंदाजे २४०० मे. टन संत्र्याची ४० रु. प्रती किलो (३ किलोसाठी रू. १००/-) या दराने विक्री करण्यात आली. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अंदाजे रु.२० ते २५ प्रति किलो फायदा झालेला आहे.

- **थेट पणन संदर्भातून मार्गदर्शन**

जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेस तोंड देण्यासाठी तसेच प्रलंबित पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी केंद्राने मॉडेल ॲक्ट प्रस्तावित केला आहे. मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी राज्यांनी स्विकारून बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, एकाधिकाराच्या ऐवजी पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट. अस्तित्वात असलेल्या बाजार समित्या व सर्व बाजार घटकांच्या हिताला कोणतीही हानी पोहोचणार नाही, या दृष्टीनेच कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या कृषि मालाची थेट खरेदी करण्यासाठी सन मध्ये महाराष्ट्र २००७ कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये नविन कलम ५ (ड) चा समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थित १३२ थेट पणन लायसन्सधारक कार्यरत आहेत. सन २०१४-१५ मध्ये थेट पणनाखालची उलाढाल रु. ११८२ कोटी होती व सन २०१५ ते फेब्रु. २०१६

पर्यंत रु. १२६९ कोटी इतकी आहे. याबाबत पणन मंडळाच्या कृषि पणन मित्र मासिकाच्या माध्यमातून, विविध प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये याबाबतची माहिती दिली जाते.

## ७) शेतकरी उत्पादक कंपनी

कृषि व्यापार विकास विभागामार्फत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाच्या थेट पणन संदर्भातील कामकाज केले जाते तसेच शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. कामे केली जातात. याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांना गठित होऊन शेती करणेबाबत, शेतकऱ्यांची कंपनी स्थापन करणेबाबत प्रोत्साहन देण्याचे काम या विभागमार्फत केले जात आहे. पिक उत्पादकता वाढ, उत्पादित मालाची गुणवत्ता वाढवून शेतकऱ्यांच्या निव्वळ नफ्यात वाढ आणि बाजार संपर्क, पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण करणे या करीता कृषि व्यापार विकास विभाग प्रयत्नशिल आहे. शेतकरी उत्पादक कंपनी संदर्भातील कंपनी स्थापन करणेबाबत मार्गदर्शन करणे, शेतकऱ्यांना संघटीत करणेबाबत प्रयत्न करणे, विविध शासकीय योजनांचा लाभ करुन देणे, शेतकऱ्यांना आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना त्यांच्या कृषि उत्पादनांच्या विक्रीसाठी मदत / मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देणे, शेतकरी उत्पादक कंपन्यांचा डेटाबेस तयार करणे, थेट शेतमाल विक्रीसाठी व्यवस्था निर्माण करणे, विविध कंपन्यांच्या समन्वयातून नविन तंत्रज्ञानाची माहिती सर्व कंपन्यांना व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करणे, कृषि व्यवसायाच्या नवनवीन संधीची दालने खुली करुन देणे इ. विविध प्रकारचे कामकाज तातडीने सुरु करण्यात येत आहे.

# फ) तळेगाव शेती विभाग

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची तळेगांव दाभाडे येथे 151 एकर जमीन आहे. यापैकी 53 एकर क्षेत्र लागवड योग्य असुन 42 एकर क्षेत्र हे पाण्याच्या तलावाखाली आहे. हॉर्टिकल्चरल ट्रेंनिंग सेंटर, आर.के.व्ही.वाय् अंतर्गत प्रोजेक्टसाठी 19 एकर जमीन प्रशिक्षणाकरिता दिलेली असुन 37 एकर क्षेत्र नाला,रस्ते,ईमारत व पडिक अशी आहे.

**रोपवाटिकाः**

रोपवाटिकेमध्ये आंबा,चिक्कु,नारळ,आवळा,चिंच,सिताफळ,अंजिर इ. फळझाडांची रोपे/कलमे तयार करून शासकिय दराने शेतक-यांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.व्यावसायिक पद्धतीने कलमे तयार करण्यात बाबतची कार्यवाही चालू आहे.

**फळबागः**

गिलबिलपट्टी प्रक्षेत्रावर 17 एकरावर असलेली पेरू,आंबा,चिक्कु,नारळ,आवळा इ. बागा असून त्याचे व्यवस्थापन व फळ विक्री दर वर्षी करण्यात येते.

**पाण्याचा तलावः**

पाण्याचा तलावा खालील क्षेत्र 42 एकर असून मच्छीमारीसाठी मावळ तालुका मच्छीमार सहकारी संस्थेस 5 वर्षे कालावधीसाठी करार करून देण्यात आलेला आहे.सन 2015-2016 कराराचे तीसरे वर्ष चालू आहे.

याव्यतिरिक्त 20 गुंठे क्षेत्राची 2 छोटी पाण्याची तळी मच्छीमारीसाठी कराराने देण्यात आलेली आहेत.
जमीन आरक्षणाबाबतः

कृषि पणन मंडळाच्या मुख्यफार्म येथिल 100 एकर जमिनीवर स्थानिक तळेगांव दाभाडे नगरपरिषदेने टाकलेल्या आरक्षण मध्ये रस्त्याव्यतिरिक्त असलेली आरक्षण रद्द करणे आलेले आहे. सोमाटणे ते तळेगाव रस्त्या संबंधी जागा उपलब्ध करुन देणे बाबत कृषि पणन मंडळाकडून ना हरकत / संमतीपत्र मा.आयुक्त,सहकार यांना पुढील निर्णयास्तव सादर करण्यात आलेले आहे.

# ६) इतर प्रकल्प

## १) आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी सहाय्यीत कृषि समृद्धी – समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM)

पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ आणि वाशिम या सहा जिल्हयांमध्ये कृषि क्षेत्रात शासनामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांमध्ये समन्वय साधून कृषि विकास साधण्याकरीता महाराष्ट्र शासन पुरस्कृत, आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी (IFAD) व सर रतन टाटा ट्रस्ट (SRTT) सहाय्यीत कृषीसमृध्दी समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM) कार्यरत झाला आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर येथे दि. ३० डिसेंबर २००८ रोजी हिवाळी अधिवेशनात प्रकल्प घेण्याची घोषणा केली. या प्रकल्पाचे उदघाटन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. मंत्री, सहकार, पणन व संसदिय कार्य महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ७ मे २०१० रोजी अमरावती येथे करण्यात आले. सदर प्रकल्प हा ८ वर्षासाठी असेल व या प्रकल्पातुन सहा जिल्हयातील सुमारे ३ लाख कुटूंबांना व २० लाख लोकांना फायदा होणार आहे. प्रकल्प क्षेत्रातील १६१९ गावांची यासाठी निवड केली जाऊन कृषि विकास साधला जाणार आहे. या प्रकल्पाबद्दल थोडयात माहिती देण्याचा याठिकाणी प्रयत्न केलेला आहे.

### प्रकल्पाचा मुख्य उद्देश

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे घटलेले कृषि उत्पन्न वाढविण्याच्या प्रयत्नांमध्ये योगदान देऊन, प्रकल्प क्षेत्रातील कुटुंबाचा, शाश्वत व वैविध्यपूर्ण उत्पनांच्या स्त्रोतांसह, कृषी व कृषियेत्तर उत्पनांच्या साधनांद्वारे विकास करणे. त्याचप्रमाणे उत्पादनातील व बाजारपेठीय जोखीमीमुळे दारिद्रय वा नैराश्याच्या परिस्थितीत न जाता कुटुंबांना सुस्थितीत पुर्नस्थापित करणे हा होय.

### प्रकल्पाची उद्दिष्टये

१. वैविध्यपूर्ण शेती आणि कृषियेत्तर उत्पनांच्या साधनांद्वारे कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ करणे.
२. सेंद्रिय शेती व किमान निविष्ठांची कंत्राटी शेती पध्दती अवलंबून कृषि विकास करणे.
३. कृषि उत्पादनांची प्राथमिक प्रक्रिया, त्यांची गुणवत्तावाढ आणि मालाची विक्री व्यवस्था इ. बाबतीत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे.
४. सुक्ष्म-वित्तपुरवठा (Micro-Finance) आणि अतिलघु-उद्योगांद्वारे महिला सक्षमीकरण.
५. शासनाचे सर्व स्त्रोत आणि योजनांमध्ये समन्वय साधणे.

### प्रकल्पाचे लाभार्थी

प्रकल्प क्षेत्रातील एकूण सुमारे ३ लाख कुटूंबांना व सुमारे २० लाख लोकांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे. प्रकल्पातील प्रत्येक गावातील २०० ते ३०० कुटुंबांना विविध योजनांच्या माध्यमातून लाभ मिळणार आहे. प्रामुण्याने सदरिल प्रकल्पातील खालील लाभार्थी असतील ;

- दारिद्रय रेषेखालील कुटूंब.
- अनुसूचित जाती, जमाती.
- अल्प व अत्यल्प भुधारक व भूमिहीन कुटूंब.
- ग्रामिण महिला.
- नैराश्यग्रस्त शेतकरी हे प्रमुख लाभार्थी असतील.

### प्रकल्पाचे प्रमुख घटक

सदर प्रकल्पाचे विविध घटकात विभाजन करण्यात आले आहे. काही प्रमुख घटक पुढील मुद्दयांद्वारे स्पष्ट करता येतील.

**१. विविध खाजगी, सेवाभावी व शासकीय संस्थांमध्ये भागिदारी निर्मिती आणि या संस्थांचा क्षमता विकास-**
महिलांचे सक्षमीकरण (SHG & CMRC)

**२. उत्पादनापासून पणन व्यवस्थेपर्यंत बाजार जाळयांद्वारे (Market Linkage) समन्वय साधणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे :**

- शाश्वत शेती
- मुळ-स्थळी जलसंधारण
- बाजार जाळयांची निर्मिती व शेती आधारित अतिलघु आणि लहान व मध्यम प्रकल्प / उद्योगांची उभारणी
- पशु संवर्धन

वरील प्रमुख घटकांवर आधारित या प्रकल्पांतर्गत योजनांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

### वर्ष २०१५-१६ मध्ये झालेली कामे

- बचतगट स्थापन - २१२५
- ९६७ अतिगरीब कुटुंबांना उघुउद्योगासाठी अर्थसहाय्य.
- १८७६ महिलांची भुमीअभिलेखात ७/१२ वर नाव समाविष्ट करण्यात आले आहे.
- शेतकरी गट स्थापना  २६६७
- १५०३ बीसीआय लर्निंग ग्रृपची बांधनी
- ३ उत्पादक कंपन्यांची स्थापना
- १२ कृषि सेवा केंद्राची स्थापना
- शेततळयाची निर्मिती  (IFAD - ४५४, Convergence -१४७)
- मूळ स्थळी जंलसंधारण - (IFAD-१७५५२.४८ हेक्टर)
- नाला सरळीकरण - (IFAD - २९, Convergence -११)
- सिमेंट नाला बांध- (IFAD- ४४, Convergence-३३)
- सि. ना. बा. गाळ काढणे (IFAD- १५८, Convergence-१२७)
- ३१४ इरिगेशन इक्विमेंटचे वाटप
- शेतकऱ्यांना उद्योजकीय प्रशिक्षण शेतकऱ्याचे प्रशिक्षण पुर्ण  IFAD- ३३४३
- सोयाबीन प्रक्रिया प्रशिक्षण ४६७ महिला
- ८६७८६ शेतक-यांना शाश्वत शेती बाबत प्रशिक्षण
- बीसीआय (BCI-Better Cotton Initiative) अंतर्गत प्रकल्पातील ५७६०७ कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे ७३२२७ हेक्टर क्षेत्रावर कापुस उत्पादन.
- १३८० कापसाच्या गाठी तयार करुन विक्री करण्यात आली.
- ४०२७ शेतकरी, ३७२०.५ हेक्टर क्षेत्राकरीता ३१ बाजार जाळयांची निर्मिती.
- १२३५.११ - टन संत्रा विक्री थेट ग्राहकांना करण्यात आलेला आहे.

**कंत्राटी शेती - क्षेत्र ४१११.४ हेक्टर**

- सोयाबीन बिजोत्पादन - २५९९ हेक्टर
- चना - ८६८.५ हेक्टर
- भेंडी बिजोत्पादन - १६०.० हेक्टर
- कांदा बिजोत्पादन - १२०.० हेक्टर
- मोहरी - ७८.७ हेक्टर
- कांदा - ९३.५ हेक्टर
- बीबीएफ पध्दतीद्वारे एकुण १३१३७ हेक्टरवर सोयाबीन, तुर, चना, पेरणी, उत्पनांमध्ये एकुण १ ते ३ क्विंटल मध्ये वाढ दिसुन आली.
- १०५९२.७ हे. क्षेत्रावर LEISA शेती
- १८७० - जैविक खत युनिटची निर्मिती
- माती परीक्षण -१११९० व ८३७६ नमुन्याचे अहवाल प्राप्त

**एकत्रीत निविष्ठा खरेदी**

- सींगल सुपर फॉसफेट -१८८० टन
- जिप्सम (Gypsum) (भूसुधारक) -१७४२ टन
- सींगल सुपर फॉसफेट Powder - ७५ टन
- एस ९ कल्चर (बायो डायनामिक व सेंद्रीय) -४०१९६ पॅकेट
- युरीया - ३१६ क्विंटल
- डिएपी - ३८ टन
- एम ओपी - २० टन
- एमओपी - २० टन
- १०:२६:२६ - १२.५ टन
- कापुस बीज -१४.५७ टन
- मका बीज -२.४६ टन
- व्हिडिसाईड - ३२७० लिटर
- लाख उत्पादन अंतर्गत १०१८ शेतकरी समाविष्ट
- शेडनेट (IFAD-९, Convergence-३)
- मधूमक्षीका पालन - १४५ बॉक्स
- एकुण २६ दालमिलची उभारणी करण्यात आली.
- ३२ स्पायरल सेपरेटर, बीबीएफ प्लँटर ७९, रोटावेटर ८, स्प्रिंकलर सेट २१०, थ्रेशर २१, ट्रक्टर ५, शेती यंत्र ८२
- जुट बॅग युनिट -१
- प्रकल्पांतर्गत ६६८२ लाभार्थींना परसाबागेतील कुक्कुटपालनाकरीता प्रोत्साहित करण्यात आले.
- ५४३ - शेळीपालन व्यवसाय
- ३५८ - घरगुती दुग्धव्यवसाय
- पशुसंवर्धण खात्यामार्फत १७८ गांवामध्ये जनावरांचे लसिकरण शिबीर

## प्रदर्शनी

### कृषिविकास प्रदर्शनी, अमरावती

- १० ते १३ एप्रिल २०१५.
- ३३ बचत गटांचा सहभाग.
- ३३ बचत गटांचा ३३ लाखांची विक्री उलाढाल.

### कृषिसमृध्दि ॲग्रो पदर्शनी, वाशिम.

- १२ ते १३ एप्रिल २०१५.
- ६४ बचत गटांचा सहभाग.
- ६४ बचत गटांचा ४.७३ लाखांची विक्री उलाढाल.

### कोकण महोत्सव, अमरावती.

- १३ ते १७ मे २०१५.
- ५ बचत गटांचा सहभाग.
- १.२० लाखांची विक्री उलाढाल.

### कलकत्ता प्रदर्शनी (ॲग्रोप्रोटेक्ट)

- १९ ते २१ नोव्हेंबर २०१५.
- ६ शेतकऱ्यांचा २५ रु. दराने १४ टन संत्रा विक्री

## जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP)

१. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचा प्रमुख उद्देश राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्याच्या शेतमालास किफायतशिर भाव मिळवुन देणे व त्यं ाचा बाजार पेठामधील सहभाग वाढविणे हा आहे.

२. हा प्रकल्प एकुण ७०८.२० कोटीचा असुन त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा ४६४.३० कोटी, महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ५२.०५ कोटी व प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी संस्थाचा हिस्सा १९१.८५ कोटी आहे.

३. घटक निहाय जागतिक बँकेच्या आर्थिक सहभागाचा तपशीलखालील प्रमाणेः

(रक्कम कोटीत)

| अंमलबजावणी कक्ष | एकूण किंमत | आर्थिक वर्ष २०१५ - १६ मध्ये झालेला खर्च | प्रकल्पाचा एकुण झालेला खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| प्रकल्प समन्वय कक्ष | ६०.७८ | ८.०६ | ३५.०८ | ५७.७१ |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | २७७.४६ | ५५०४९ | १९१.१३ | ६९.०० |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) | १६८.९७ | २५.४६ | ९०.९५ | ५४.०० |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पशुसंवर्धन) | ९.१३ | १.९५ | ५.५१ | ६०.३५ |
| **एकूण** | **५१६.३५** | **९०.९६** | **३२२.६८** | **६२.५०** |
| लाभार्थि हिस्सा | १९१.८५ | १२.९२ | ४१.५६ | २१.६५ |
| **एकूण** | **७०८.२०** | **१०३.८८** | **३६४.२४** | **५१.३७** |

४. जिल्हास्तरीय 'आत्मा' तालुका स्तरावरील शेतकरी माहिती व सल्ला केंद्र, फलोत्पादन प्रक्रिया संस्था, औरंगाबाद व वानामती, नागपूर यासारख्या निवडक प्रशिक्षण संस्थांच्या बळकटीकरणातून कृषी तंत्रज्ञान व बाजारपेठांशी जोडणी यासाठीचे प्रयत्न केले जात आहेत. सर्व जिल्ह्यातील आत्मा कार्यालयांमध्ये कामात गती यावी यादृष्टीने काम्पुटर, लॅपटॉप, प्रोजेक्टर यासारख्या सुविधा उपबद्ध केल्या आहेत. याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे स्थापित शेतकरी माहिती व सल्ला केंद्रांसाठी देखील माहिती तंत्रज्ञान संबंधी सुविधा उदा. एलसीडी प्रोजेक्टर, पोष्टर्स इ. सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, जेणेकरुन खेडेगावातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून शेतीविषयक तांत्रिक माहिती देवून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होईल. प्रकल्प कामाशी संबधीत सर्व जिल्ह्यातील कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांसाठीप्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जाते. या कार्यशाळांमुळे प्रकल्पाशी संबंधीत माहिती मिळून कामास गती मिळते आहे. तसेच काही विशेष कार्यशाळांचे आयोजन वर उल्लेख केल्यानुसार प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातूनही आयोजित केल्या जातात.

५. प्रकल्पातील उपघटकांचा लाभ गाव स्तरावरील शेतकऱ्यांना होणे महत्वाचे असल्याने गावागावात शेतमाल उत्पादनानुसार शेतकऱ्यांचे गट व उत्पादक संघ स्थापनेचे काम प्रगतीपथावर असून पहिल्या टप्प्यातील जिल्ह्यातूनसुमारे ३९०० शेतकरी गटांची स्थापना केली आहे. तसेच दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील २३ जिल्ह्यांमध्ये ८९०५ शेतकरी गटांची स्थापना केली आहे.

६. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून नियमीतपणे राबविले जाणारे उपक्रम म्हणजे पीक प्रात्यक्षिके, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, पी.पी.पी. तत्वावर पीक प्रात्यक्षिकांची बाजारपेठेशी जोडणी, नाविण्यपूर्ण प्रकल्प हे या वर्षीदेखील

सर्वच जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे नियमीतपणे संनियंत्रण व मुल्यमापन करुन अंमलबजावणीमध्ये आवश्यकते बदल केले जातात.

७. सर्व ३३ जिल्ह्यांसाठी विपणन आराखडेतयार करणे, विक्रेते-ग्राहकसंमेलनांचे आयोजन करणे, उद्योजकता विकास कार्यक्रम, उत्पादकसंघांचे बळकटीकरण यासारखे उपक्रमदेखील अहवाल काळात राबविण्यात आले.

८. कृषी व्यवसाय निर्मिती सुविधा या यंत्रणेने आपला कार्यविस्तार वाढविला असून कृषी व विपणन तंत्रज्ञानविषयक माहिती देण्यासाठी अधिकाऱ्यांच्या कार्यशाळांचे आयोजन, प्रकल्पांतर्गत स्थापित कंपन्यांसाठी व्यवसाय आराखडेतयार करणे, प्रकल्पाशी संबंधीत माहिती अभ्यास अहवाल-विविध उपक्रमांच्या माहिती पुस्तिकांचे प्रकाशन करणेतसेच काही विशेष अभ्यास हाती घेवून त्यासंबंधी आवश्यकतेसहाय्य करणे इ. उपक्रम राबविण्यात आले.

९. पशुधन आधार सेवा या प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- पशुसंवर्धन यांच्या घटकांतर्गत जनावरांच्या बाजारांमध्ये बांधकामे हाती घेवून आवश्यकसोई- सुविधांच्या निर्मितीबरोबरच संबंधीत जिल्ह्यांमध्ये क्षेत्रीय स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये जनावरांची शिबीरांचे आयोजन, चारा पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन यासारख्या उपक्रमांचे आयोजन निवडक १८ जिल्ह्यांमध्ये करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्यामध्ये शेळी-मेंढी पालकांचे गट व फेडरेशनची स्थापना करण्यात आली असुन १५० गटांची स्थापना केली आहे. निवडलेल्या शेळी-मेंढी पालकांचे प्रशिक्षण व काही गटांमध्ये उस्मानाबादी पैदासक्षम बोकडांचे वाटप करणेही कामे पूर्ण केली आहेत. याचप्रकारे यवतमाळ जिल्ह्यामध्ये शेळीपालन एक उच्चमुल्यवर्धी व्यवसाय या उपघटकांतर्गत शेळीपालनाची २५० प्रात्यक्षिके उभी करण्यात आली असून निवडक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चारा पिक प्रात्यक्षिके घेणे, निवडलेल्या शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, उस्मानाबादी पैदासक्षम बोकडांचे वाटप करणे यासारखे उपक्रम राबविले आहेत.

१०. शेतकऱ्याच्या मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काही पर्यायी बाजारपेठेची साधने उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न प्रकल्पांतर्गत केला जातो. याचाच एक भाग म्हणून वखार महामंडळाच्या निवडक गोदामांमध्ये धान्य चाचणी प्रयोगशाळा स्थापित करणे व धान्य तारण योजनेस चालना देणे, शेतकरीसामुहिक सेवा केंद्र सुरु करुन त्यांना गती देणे, आठवडी बाजारांमध्ये सुविधा निर्माण करणे यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. आजअखेर ३०६ आठवडी बाजारांचे काम पूर्ण झाले असून ९४ आठवडी बाजारांचे काम प्रगतीपथावर आहे.

११. राज्यातील वखार महामंडळाच्या निवडलेल्या ११२ गोदामांची तसेच ४० गोदामांमध्ये प्रयोगशाळा स्थापित करण्याच्या दृष्टीने आवश्यकसाधनांची व उपकरणांची खरेदी पूर्ण झाली आहे. एकूण १२१९६ शेतकऱ्यांनी वखार महामंडळाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. आता पर्यंत ३६,२०२ गोदम पावत्या शेतकऱ्याना प्रदान करण्यात आल्या आहेत. या गोदामांमध्ये १,९२,३४४ मेट्रीक टन धान्य साठा केला गेला असून रु. १५३.०९ कोटीचे कर्ज धान्य पावती योजने अंतर्गत देण्यात आले.

१२. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या बाजार समित्यांच्या कामात गतीशीलता येवून केलेल्या सुधारणांचा प्रत्यक्ष लाभ बाजारातील अनेक घटकांनाहोईल यासाठी चांगल्या व्यवस्थापनाची गरज असते. ही बाब ध्यानात घेवून बाजार समित्यांच्या संचालकांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, कर्नाटक राज्यातील बाजार समित्यांच्या कामाची माहिती व्हावी यादृष्टीने अभ्यासदौरे तसेच संबंधीत अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन इ. उपक्रम अहवाल काळात घेण्यात आले.

१३. एकूण ४५ बाजार समित्या व १६ जनावरांच्या बाजारांमधील बांधकामे पूर्ण झाली आहेत. याशिवाय २३ बाजार समित्या व ३ जनावरांच्या बाजारातील बांधकामे सुरु असून १४ बाजार समित्यांमधील व ५ जनावरे बाजारांचे काम नजिकच्या काळात सुरु होईल यादृष्टीने नियोजन केले आहे.

१४. एकूण १५० बाजार समित्यांमध्ये बाजार माहिती फलक प्रकल्पा मार्फत लावण्यात आले आहेत. तसेच एकूण २५ बाजार समित्यांमध्ये सगंणकीय लिलाव पद्धतीचा अवलंब प्रकल्पामार्फत केला जाणार आहे. सध्या ५ बाजार समित्यांमध्ये संगणकीय लिलाव पद्धत कार्यान्वीत करण्यात आली आहे.

१५. टॅली सॉफ्टवेअरच्या माध्यमातून राज्यातील सर्व बाजार समित्यामध्ये समान लेखे पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

१६. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रकल्पाच्या प्रगतीचे संनियंत्रण, पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन उपाययोजनांची अंमलबजावणी, प्रकल्प निधीचे संनियंत्रण व तक्रार निवारण यंत्रणा कार्यरत आहेत. त्यादृष्टीने प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधीत सर्व अधिकारी व संलग्न शासन विभागाचे विविध स्तरावरील अधिकारी यांना मार्गदर्शकसूचना निगर्मीत केल्या आहेत. याशिवाय संलग्न शासन विभागाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना दिल्या जातात.

१७. जागतिक बँके चे अधिकारी व मा. अतिरिक्त मुख्य सचिव (कृषी व पणन) यांच्या वेळोवेळी उपप्रकल्पांना भेटी व प्रदीर्घ बैठकांचे आयोजन करुन नियमीतपणे मार्गदर्शन यामुळे प्रकल्पाच्या कामात गती येवून प्रभावी अंमलबाजवणी होत आहे, त्याबद्दल प्रकल्पाचे वतीने त्यांचे आभार.

# ३) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत "कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" (AIDIP)

केंद्र शासनाने प्रसृत केलेल्या मॉडेल ॲक्टप्रमाणे कृषि पणन कायद्यामध्ये सुधारणा केलेल्या राज्यांमध्ये कृषि उत्पादनाच्या वाढी बरोबरच महत्वपुर्ण असणाऱ्या "कृषि पणन व्यवस्था" या घटकाच्या विकासार्थ सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत. त्या अनुषंगाने आशियायी विकास बँक सहाय्यीत "कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" ह्या प्रकल्पात महाराष्ट्र राज्याचा समावेश झालेला असून या प्रकल्पाकरीता सहकार व पणन विभागाची कार्यकारी यंत्रणा म्हणून व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्ति करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पाद्वारे कृषि विकासाच्या मार्गातील सध्याची कालबाह्य झालेली काढणीपश्चात हाताळणी व्यवस्था, कृषि विपणन क्षेत्रामधील पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये असलेला सार्वजनिक गुंतवणूकीचा अभाव, नगदी पिकांच्या बाबतीत असलेले मर्यादीत वैविध्यकरण इ. अडथळ्यांवर मात करण्याकरीता "एकात्मिक मुल्य साखळी" (Integrated Value Chain) या प्रतिमानावर (model) आधारीत एकात्मिक मुल्य साखळयांची निर्मिती राज्याच्या विविध भागांमध्ये उत्पादित होणाऱ्या कृषि मालाकरीता करण्यात येणार आहे. या मुल्य साखळयांतर्गत कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा व रस्ते, वीज, पाणी यांसारख्या इतर सुविधा त्याचप्रमाणे बाजारपेठ विषयक संशोधन (market intelligence), शेतकऱ्यांची क्षमता बांधणी (capacity building) व अस्तित्वात असलेल्या मुल्य साखळ्यांच्या बळकटीकरणाद्वारे कृषि मालाच्या मुल्य साखळी लगतच्या भौतिक व संस्थात्मक जाळयांमध्ये सुधारणा घडवून आणण्यात येणार आहे.

एकात्मिक मुल्य साखळीमध्ये कृषि व्यापाराशी निगडीत अनेक घटकांच्या म्हणजेच शेतकरी, व्यापारी, निर्यातदार तसेच उद्योजक व इतर सर्व स्टेक होल्डर्सच्या आवश्यक मुलभूत गरजा लक्षात घेवून राज्यातील त्या त्या भागामध्ये आवश्यक कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने संकलन केंद्रे, प्रतवारी व पॅकिंग केंद्रे, साठवणूक सुविधा, (Ambient and controlled temperature) मुल्यवर्धन आणि बाजारपेठे विषयक संशोधन, वितरण व लॉजिस्टीक्स आणि कृषि मालाच्या उत्पादनापासून ग्राहकापर्यंतच्या (end to end) बाजार जाळयांची निर्मिती करणे इ. चा समावेश आहे.

या प्रकल्पाअंतर्गत राज्यामध्ये एकात्मिक मुल्य साखळयांची निर्मिती सार्वजनिक खाजगी भागीदारीतून करण्यात येणार असून सर्व मुल्य साखळया "हब-स्पोक" मॉडेलवर आधारीत असतील. स्पोकच्या ठिकाणी त्या-त्या भागातील प्रमुख नगदी पिकांचे उत्पादन लक्षात घेवून त्यानुसार पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने केळी, डाळींब, द्राक्ष, आंबा, मोसंबी, संत्रा, लिंबू, पपई तसेच टोमॅटो, वांगी, बटाटा, कांदा, आले, मिरची इ. पिकांचा समावेश असेल. हबच्या ठिकाणी सर्व स्पोकमधून उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या कृषि मालाकरीता आवश्यक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने कृषिमालाच्या प्रकारानुसार मालाची सफाई, प्रतवारी, पॅकिंग, गोदामे, शितगृह, रायपनिंग चेंबर इ. तसेच मुलभूत सुविधांमध्ये नॉलेज सेंटर, व्यापार केंद्र, अतिथीगृह, अंतर्गत रस्ते, वीज व पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, बगीचा, उपहारगृह व वाहनतळ इ. चा समावेश असणार आहे. हब येथून कृषिमाल देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये विक्री करण्याकरीता रेल्वे, विमानतळ येथे आवश्यक कार्गो सुविधा व इतर पायाभूत सुविधांचा विकास करणे अपेक्षीत आहे.

या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दोन तर पुढील ७ वर्षात राज्यात साधारणत: १३-१५ IVCs उभारणे प्रस्तावित आहेत. पहिली नाशिक मूल्यसाखळी (अंदाजित खर्च रु.७५.३३ कोटी) व दुसरी औरंगाबाद-अमरावती मूल्यसाखळी (अंदाजित खर्च रु.२७.१३ कोटी) यामध्ये एकुण १५ ठिकाणांचा समावेश आहे.

या प्रकल्पाकरीता भांडवली गुंतवणूकीचे प्रमाण खाजगी गुंतवणूकदार – किमान ६० टक्के, आशियायी विकास बँक - ३२ टक्के व राज्य शासन - ८ टक्के असे असून या प्रकल्पांतर्गत निर्माण होणाऱ्या पायाभूत सुविधा बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वाने उभारण्यात येणार असून त्याची संपुर्ण मालकी राज्य शासनाची राहणार आहे. या प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सोयी सुविधा खाजगी गुंतवणूकदारांस २० वर्षांपर्यंत वापरता येतील. सदर प्रकल्पाकरीता आवश्यक जमीन शासन उपलब्ध करुन देणार असून यामध्ये शासकीय, कृषि उत्पन्न बाजार समिती किंवा सहकारी संस्थांच्या मालकीच्या जमीनींचा प्राधान्याने विचार केला जाणार आहे.

नाशिक व औरंगाबाद-अमरावती मुल्य साखळी अंतर्गत उभारण्यात येत असलेल्या सुविधांना शेतमालाचा निश्चित पुरवठा व्हावा यासाठी 'लहान शेतक-यांना बाजारपेठेशी जोडण्याचा प्रकल्प' 'जपान फंड फॉर पॉव्हर्टी रिडक्शन' (JFPR) कडुन उपलब्ध झालेल्या अनुदानातुन राबविण्यात येत आहे. या मूल्यसाखळयांच्या क्षेत्रातील शेतक-यांचे गट बनविण्यात येतील व त्या नंतर गटांची उत्पादक कंपनी (Producers Company) तयार करण्यात येणार आहे. अशा प्रकारे सुमारे २०,००० शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येईल व किमान ३ उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात येतील.

सदर प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या सुमारे १५ एकात्मिक मुल्य साखळयांच्या माध्यमातून ग्रामिण भागांमध्ये कृषि व्यापार विषयक व पणन विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे विविध फळे व भाजीपाला यांसारख्या नाशवंत कृषि मालाचा दर्जा वाढून त्यांच्या मागणीत वाढ होईल तसेच शेतकऱ्यांना अधिक बाजारभाव मिळू शकेल. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे व शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्यांमुळे शेतकरी थेट व्यापारी, निर्यातदार व प्रक्रियादार यांच्याशी करार करु शकतील व त्यामुळे त्यांना कृषि मालाच्या भावाची तसेच उत्पन्नाची हमी मिळेल. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने शेतकरी तांत्रिक दृष्ट्या सक्षम होतील, त्यामुळे कृषि मालाच्या दर्जामध्ये सुधारणा होईल. ग्राहकांना स्वच्छ व ताजा कृषि माल उपलब्ध होईल. या प्रकल्पांतर्गत विकसित होणाऱ्या मुल्य साखळयांभोवती कृषि प्रक्रिया उद्योगांच्या उभारणीस चालना मिळेल. अशा प्रकारे या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांमध्ये त्या त्या भागातील पिकांच्या उत्पादनानुसार आवश्यक त्या कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती झाल्याने त्याचा लाभ शेतक-यांना होणार असून त्यांचे आर्थिक उत्पादन वाढणार आहे.

**करण्यात आलेले कामकाज**

- प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ अंतर्गत स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMU) स्थापना करण्यात आलेली आहे.
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालिल राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करण्यास मान्यता दिलेली होती. त्यामध्ये प्रकल्प उभारणीसाठी खाजगी जमीन वापरास परवानगी, प्रकल्प हस्तांतरणाची मुदत २० ऐवजी २५ वर्षे, संपुर्ण मूल्यसाखळी एकाच गुंतवणूकदाराला विकसनासाठी देण्याऐवजी प्रत्येक स्पोकसाठी स्वतंत्र गुंतवणूकदार निवडण्यास परवानगी अशा काही महत्वाच्या बदलांचा समावेश होता. प्रकल्प आराखड्यात करण्यात आलेले बदल गुंतवणुकदारांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच गुंतवणुकदारांच्या अडचणी व सुचना जाणून घेण्यासाठी व

कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा उभारणीमध्ये जास्तीत जास्त खाजगी गुंतवणुक येण्याच्यादृष्टीने त्याशिवाय केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या (विदेश व्यवहार विभाग) व आशियाई विकास बँकेच्या सुचनेनुसार दि. १७ एप्रिल २०१५ रोजी नागपूर, दि. १८ एप्रिल २०१५ रोजी पुणे व दि. २८ एप्रिल २०१५ रोजी औरगाबाद येथे रोड शो चे आयोजन करण्यात आले होते. सदर रोड शोसाठी पीएमयु चे प्रतिनिधी, प्रकल्पाचे सल्लागार व गुंतवणुकीस इच्छुक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

- राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करण्यास दिलेली मान्यता, रोड शोमध्ये प्राप्त झालेल्या सुचना, तसेच राज्याच्या पीपीपी सेलचे पीपीपी तज्ञ, प्रकल्पाचे सल्लागार यांच्याशी चर्चा करून नाशिक व औरंगाबाद-अमरावती एकात्मिक मुल्य साखळयांसाठी खाजगी गुंतवणुकदार निवडीसाठी सुधारित बीड डॉक्युमेंट तयार करण्यात आले. राज्य शासनाच्या पीपीपी सेलने सदर सुधारित Bid Documents Validation केले बाबत दि. २३ ऑक्टोबर २०१५ रोजी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने कळविले.
- दि २७.ऑक्टोबर २०१५ रोजी सुधारित Bid Documents दोन इंग्रजी व एका मराठी वृत्तपत्रात तसेच महाटेंडर्स व कृषि पणन मंडळाच्या वोबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आले.
- दि. १६ जानेवारी २०१६ या अंतिम तारखेस जालना व पैठण या दोन स्पोकसाठी प्रत्येकी एक प्रस्ताव प्राप्त झाला. दि. १८ जानेवारी २०१६ रोजी सदर प्रस्ताव उघडण्यात आले. तथापि सदर प्रस्ताव Nonresponsive असल्याने खाजगी गुंतवणुकदार निवडीविना निविदा प्रक्रीया पुर्ण झाली .
- JFPR प्रकल्पाअंतर्गत शेतक-यांच्या १८ उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आल्या असुन त्यांना कामकाजात मदत करण्यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातुन बिझनेस डेव्हलपमेंट फॅसिलिटेटर्सची (बीडीएफ) नियुक्ती करण्यात आलेली आहे. बीडीएफच्या माध्यमातून कंपन्यांचे भागभांडवल व सभासद वाढविणे, कंपन्यांकडे असलेल्या शेतमालाची माहिती संकलित करणे, कंपन्यांचे बिझनेस प्लॅन तयार करणे व कंपन्यांना विविध बाजारपेठांशी जोडण्याचे कामकाज करण्यात येत आहे.
- १७ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे बिझनेस प्लॅन तयार करण्यात आले. क्षमता विकास कार्यक्रमाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या एकूण १०५ संचालकांना मॅनेज, हैद्राबाद व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे मार्केटींग विषयी प्रशिक्षण देण्यात आले.
- शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालकांना प्रोत्सहान देण्याच्यादृष्टीने इतर यशस्वी शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषि विज्ञान केंद्र, फळे व भाजीपाल्याचे थेट विक्री व्यवस्थापन करणा-या संस्था तसेच कृषि प्रक्रीया युनिट इ. ठिकाणी अभ्यास दौ-यांचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास दौ-याअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या एकूण ९९ संचालकांनी सहभाग घेतला.
- दुस-या टप्प्यातील ४ मुल्यसाखळयांसाठी पहिल्या टप्प्यातील सुधारित बीड प्रक्रीयेतील सर्व तरतुदी व खाजगी जागेचा पर्याय वापरून निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी. अथवा प्रकल्प पीपीपी तत्वावर न राबविता पुर्ण नवीन स्वरूपातील प्रकल्प एडीबीला सादर करण्यात यावा असा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आलेला आहे.

***